
काबरा एक्सप्रेस
डेली A/C बस / अर्जंट पार्सल सर्विस • फुल लोड / पार्ट लोड सर्विस उपलब्ध
गुजरात — अहमदाबाद, सुरत, अंकलेश्वर, राजकोट, बडौदा, किम, आनंद,नवसारी, वलसाड, वापी, भरुच, जामनगर
मध्यप्रदेश — इंदौर, (राज महौल्ला, तीन इमली) उज्जैन
महाराष्ट्र — मुंबई, (वसई, बोरीवली, अंधेरी, भिवंडी, वाशी) औरंगाबाद, नाशिक, पुणे
राजस्थान — उदयपुर, अजमेर, जयपुर — दिल्ली — मोरी गेट
साऊथ — बंगलोर, हैदराबाद, गोवा
अहमदनगर — नेवासकर पेट्रोल पंपासमोर, मार्केटयार्ड चौक, स्टेशन रोड
7972872112
EYE Q MEDIA


संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा




गर्मी में भी सर्दी का मजा
COMPRO Systems & Services
Symphony DAIKIN BLUE STAR VOLTAS Carrier
कुलर, ए.सी., फ्रीज
सुलभ हप्त्यावर उपलब्ध 0% फायनान्स
HDB FINANCIAL SERVICES BAJAJ FINSERV
• वॉशिंग मशिन • एलईडी टीव्ही • होमथिएटर • मोबाईल • होम अप्लायन्सेस
अंबर प्लाझा, एचडीएफसी बँके जवळ, स्टेशनरोड, अ.नगर. मो. ९३२५१०३०५०



रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. २२.०१.२०२५ | अंक नं. २७२ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020



प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090


# बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचा मनमानी कारभार सुरुच

## कामकाजात सुधारणा करण्याच्या मागणीसाठी कामगार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचे बेमुदत धरणे आंदोलन

नगर – महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे काम नियमानुसार होत नसल्याच्या निषेधार्थ अहमदनगर जिल्हा इमारत व इतर बांधकाम कामगार संघटनेच्यावतीने २२ जानेवारीपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू करण्यात आले आहे.



बेमुदत धरणे आंदोलन करताना संघटनेचे पदाधिकारी. (छाया – बबलू शेख)

निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे कामकाज अहिल्यानगर जिल्ह्याचे सहाय्यक कामगार आयुक्त यांच्या देखरेखीखाली चालते. जिल्ह्यात नोंदीत बांधकाम कामगारांची मोठी संख्या झाली आह. बऱ्यापैकी या मंडळाचे लाभ कामगारांना मिळाले देखील आहेत.मात्र या मंडळाचे कामकाजाचे दुर्दैव हे आहे कि, अधिकारी कर्मचारी बदलला की, त्यांचे सर्व नियम अधिकारी कर्मचारी त्यांच्या मर्जी प्रमाणे बनवतात व त्याप्रमाणे कामगारांना काम करण्यास भाग पाडतात. यामध्ये मंडळाने ठरवून दिलेल्या निकषाला अक्षरक्षा केराची टोपली दाखवली जाते. अलीकडच्या काळात या अधिकारी कर्मचाऱ्यांच्या संपूर्ण बदल्या झाल्या आहेत. या कर्मचाऱ्यांना कामगार अधिकारी असून देखील कामगार कायदे शिकवण्याची वेळ आमचेकर आली आहे असे दिसत आहे मात्र ते हे कबुल करत नाही की आम्हाला कामगार कायदे समजत नाही किंवा जाणूनबुजून कामगारांना त्रास देण्यासाठी त्यांनी सदरचा चार्ज घेतलेला आहे, असे दिसत आहे.

नव्याने या मंडळाचे तालुका निहाय सुविधा केंद्र सुरु केले आहे याचा उद्देश कामगारांना सेवा सुविधा सुलभ होण्याचा हेतू असेल असे आमचे मत झाले होते. मात्र या सुविधा केंद्रामधून भरलेले व यांच्याच कामगारांनी भरलेले अर्ज हेच अधिकारी बाद करत आहेत. पुन्हा हा अर्ज जर भरायचा झाल्यास याचा नाहक मानसिक त्रास सहन करून पुन्हा नव्याने तोच अर्ज कामगाराची कोणतीही चूक नसतांना भरावे लागत आहे. यामध्ये सुधारणा व्हावी असे पत्र दिले होते. मात्र त्याचा काहीही फरक यांना पडला नाही. त्यांनी त्यांचे मनमानी पद्धतीने धोरण तसेच सुरु ठेवल्याने या पिळवणूकीच्या निषेधार्थ मंडळाचे कामकाजात कायदेशीर निकषाप्रमाणे नवीन नोंदणी, नुतनीकरण, प्रस्ताव वाटप, भांडे वाटप, पेटी वाटप व सर्वच बाबींचे मंडळाने ठरवून दिलेले निकषाचे लेखी प्रोसेडींग आपल्या समोर होत नाही तोपर्यंत आम्ही शांततेच्या मार्गाने २२ जानेवारीपासून बेमुदत धरणे आंदोलन सुरु करत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. या आंदोलनात संघटनेचे नंदू डहाणे, अमोल चिंधे, ओंकार वायाळ, प्रविण कांबळे, आकाश वायाळ, अप्पासाहेब जगधने, सोमा गवारी, संपत गवारी, मंजदा घोडे, पंडित कांबळे, मनोज शिंदे, साजिद सय्यद, अनिल शिंदे, गोवर्धन घाडगे आदी सहभागी झाले आहेत.

# नगरमधून दोन अल्पवयीन मुलींना फुस लावून पळवले

## अज्ञात व्यक्तींच्या विरोधात पोलिस ठाण्यात पुन्हा २ गुन्हे दाखल

नगर – नगर शहरासह जिल्ह्यात अल्पवयीन मुलींना फुस लावून पळवून नेण्याच्या घटना वाढतच असून अशाच आणखी दोन घटना नगर शहरात घडल्या आहेत. तारकपूर बसस्थानकातून एका १५ वर्षीय तर केडगावच्या नेप्ती रोड परिसरातून १६ वर्षीय अल्पवयीन मुलीला अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेल्याच्या घटना ताज्या असताना २१ जानेवारीला सकाळी काटवन खंडोबा परिसरातून १६ वर्षीय तसेच दुपारी लालटाकी परिसरातील एका महाविद्यालयाच्या परिसरातून १७ वर्षीय मुलीला अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेले आहे. याप्रकरणी २ अज्ञात व्यक्तीविरोधात अपहरणाचे २ गुन्हे कोतवाली व तोफखाना पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आले आहेत.

पहिल्या घटनेत काटवन खंडोबा परिसरातून १६ वर्षीय मुलगी सकाळी १० च्या सुमारास शेजारी कामानिमित्त जावून येते असे सांगून घराबाहेर पडली ती पुन्हा घरी आलीच नाही. तिच्या कुटुंबीयांनी तिचा आजूबाजूला शोध घेतला. पण ती मिळून आली नाही. त्यामुळे आपल्या बहिणीला कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी आपल्या कायदेशीर रखवालीतुन पळवून नेले असल्याची फिर्याद सदर मुलीच्या बहिणीने कोतवाली पोलीस ठाण्यात दिली आहे. या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात व्यक्ती विरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १३७ (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

दुसऱ्या घटनेत एमआयडीसी परिसरातील एका गावात राहणारी १७ वर्षीय मुलगी दुपारी तिच्या आईला सीईटीचे फॉर्म भरण्यासाठी मैत्रिणी सोबत नगरमधील महाविद्यालयात जाते असे सांगून घरातून गेली. ती पुन्हा परतली नाही. त्यामुळे आपल्या मुलीला कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी आपल्या कायदेशीर रखवालीतुन पळवून नेले असल्याची फिर्याद सदर मुलीच्या आईने २१ जानेवारीला सायंकाळी तोफखाना पोलिस ठाण्यात दिली आहे.

या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात व्यक्ती विरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १३७ (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# नगरमध्ये मध्यरात्रीच्या सुमारास आठ जणांच्या टोळक्याचा धुडगूस

## एका जणास कोयत्याने व दांडक्याने बेदम मारहाण, वाहनांच्या काचा फोडत दहशतीचा प्रयत्न

नगर – नगर शहरातील जुन्या कोर्टाजवळ ८ जणांच्या टोळक्याने २१ जानेवारीला मध्यरात्रीच्या सुमारास चांगलाच धुडगूस घातला. फायनान्स कंपनीत काम करणाऱ्या तरुणाला कोयता तसेच लाकडी दांडक्याने बेदम मारहाण केली. त्याच्या मित्रांनाही शिवीगाळ दमदाटी करत परिसरात दहशत पसरविण्यासाठी चारचाकी वाहनाच्या काचा फोडून नुकसान केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी कोतवाली पोलिसांनी ८ जणांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.



वाहनांच्या काचा फोडल्याचे छायाचित्रात दिसत आहे.

या मारहाणीत जखमी झालेल्या आरीफ गयासुद्दीन शेख (वय २४, रा. जुने कोर्ट जवळ, अ.नगर) याने जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार घेत असताना दिलेल्या जबाबावरून पोलिसांनी मयुर साठे, अनिकेत साळुंके, आदर्श साळुंके, राहुल रोहकले, आयान शेख, जियान शेख, अब्दुल समद शेख, गणेश भुजबळ (सर्व रा. नालेगाव, अ.नगर) यांच्या विरुद्ध बी.एन.एस.२०२३ चे कलम ११८ (१), १८९ (२), (४), ३२४ (४), ३५१ (२), ३५२, शस्त्र अधिनियम ४/२५ नुसार गुन्हा दाखल केला आहे.

या संदर्भात पोलिस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, जखमी आरीफ शेख हा बजाज फायनन्स मध्ये मोबाईल लोन च्या फाईलचे काम करतो.११ जानेवारीला दुपारी त्याला मोबाईलवर अनोळखी मोबाईल नंबर वरुन फोन आला. समोरील व्यक्तीने त्याला शिवीगाळ, दमदाटी केली. त्याबाबत आरीफ शेख याने कोतवाली पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्ह्याची नोंद केली होती. त्यानंतर १७ जानेवारीला रात्री शेख याच्या घरावर काही जणांनी दगडफेक केली. शेख याने घराला लावलेल्या कॅमेऱ्याचे सीसीटीव्ही फुटेज पाहीले असता दगडफेक करणारे हे त्याच्या पाहण्यातील मयुर साठे, अनिकेत साळुंके, आदर्श साळुंके हे होते.

त्यानंतर २१ जानेवारीला मध्यरात्री साडेबारा वाजता शेख हे घरासमोर मित्रांसमवेत गप्पा मारत बसलेले होते. त्यावेळी तेथे तीन ते चार दुचाकीवरुन मयुर साठे, अनिकेत साळुंके, आदर्श साळुंके, राहुल रोहकले, आयान शेख, जियान शेख, अब्दुल समद शेख, गणेश भुजबळ (सर्व रा. नालेगाव) हे आले त्यावेळी मयुर साठे याचे हातात कोयता व इतर मुलांच्या हातात लाकडी दांडके होते. मयुर साठे व आदर्श साळुंके यांनी शेख यास का रे खुप माजला आहे का, तुला फोनवर नीट बोलता येत नाही का, असे म्हणुन शिवीगाळ केली. त्यावेळी शेख त्यानी मी फोनवर काय वाईट बोललो अशी विचारणा केली असता त्याचा राग आल्याने मयुर साठे याने त्याचे हातातील कोयत्याने शेख याच्या डाव्या हाताचे कोपऱ्याजवळ व तळहाताला मारले. तसेच आदर्श साळुंके याने शेख याच्या डाव्या पायाचे नडगीवर मारले.

### 'डायल ११२' ला फोन करुन माहीती देताच झाले पसार

यावेळी शेख सोबत असलेले मित्र भांडण सोडवण्याकरीता आले असता मयुर साठे व त्याचे सोबत असलेल्या सर्वांनी त्यांना शिवीगाळ करुन दमदाटी केली. तसेच दहशत करण्याकरीता जवळ असलेली अरबाज शेख याची स्वीफ्ट चार चाकी (क्र.एम एच १२ क्यू टी ८५७४) तसेच मित्राची ईरटीका चारचाकी गाडी (क्र.एम एच १६ सी वाय ८९१०) यांच्या काचा फोडुन नुकसान केले आहे. या मारहाणीत शेख याच्या डाव्या हाताला पायाला तसेच मित्र मुस्ताफ रईस सय्यद यास नाकाजवळ दुखापत झाली आहे. यावेळी शेखचा भाऊ नदीम याने डायल ११२ ला फोन करुन माहीती दिली. पोलीस येत असल्याचे पाहुन मारहाण करणारे निघुन गेले असल्याचे आरीफ शेख याने जबाबात म्हंटले आहे. या प्रकरणी कोतवाली पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पोलिस आरोपींचा शोध घेत आहेत.


विकणे/भाड्याने देणे
शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी दुसऱ्या मजल्यावर २ बीएचके फ्लॅट भाड्याने देणे. मिसाळगल्ली, तेलीखुंट, पावरहाऊस
पाईपलाईन रोड, तुळजाभवानी मंदिरासमोर कृष्णा आनंद कॉम्प्लेक्स या नविन इमारतीत पहिल्या मजल्यावर, रोडलगत
१) कारपेट क्षेत्र ४४० स्क्वे. फुट विकणे किंवा भाड्याने देणे
२) कारपेट क्षेत्र १३५० स्क्वे. फुट भाड्याने देणे
ऑफिस, बँक, ओ.पी.डी. किंवा व्यवसायिक वापरासाठी
संपर्क : 8623963979

सावेडी येथे कमी दराने गाळा भाड्याने उपलब्ध
9422221946


# अहिल्यानगरच्या पानवाल्याची मुलगी 'यक नंबर' चित्रपटात

## कु. श्रिशा आकडकरचा ज्ञानेश्वर माऊली मालिकेत देखील अभिनय, १०० व्या अखिल भारतीय मराठी विभागीय नाट्य संमेलनातील बालनाट्यात सहभाग

नगर – अहिल्यानगर एमआयडीसी मधील पानाचे दुकान चालवणाऱ्या पंकज आकडकर या सर्वसामान्य व्यवसायिकाची मुलगी कु.श्रिशा पंकज आकडकर ही ११ वर्षीय बालकलाकार २६ जानेवारी रोजी दूरचित्रवाहिनीवर प्रदर्शित होणाऱ्या येक नंबर या चित्रपटात अभिनयाच्या माध्यमातून झळकली असून सोनी मराठी वाहिनीवरील ज्ञानेश्वर माऊली या मालिकेत देखील कु. श्रिशा ने मालिकेच्या विविध भागांमध्ये अभिनय करून अहिल्यानगरचे राज्य पातळीवर नाव झळकावले आहे.



झी स्टुडिओच्या यक नंबर या चित्रपटाचे दिग्दर्शक – राजेश म्हापुस्कर असून निर्मात्या – मराठी सिनेअभिनेत्री तेजस्विनी पंडीत व वरदा नाडियादवाला आहेत. अभिनेत्री तेजस्विनी पंडित, पुष्कर शोत्री संजय मोने, धैर्य घोलप सायली पाटील, अजय भुरे यांच्याबरोबर कु. श्रिशा हीने अभिनयाचे काम केलेले असून या चित्रपटास अजय अतुल यांचे संगीत लाभले आहे.

त्याचबरोबर सोनी मराठी वाहिनीवरील दिग्पाल लांजेकर आणि चिन्मय मांडलेकर निर्मित ज्ञानेश्वर माऊली या मराठी मालिकेतदेखील कु. श्रिशा हिने बाल मुक्ताईचा उत्कृष्ट अभिनय सादर केला आहे. या मालिकेचे ५०० पेक्षा अधिक भाग पूर्ण झाले असून जगभरात ही मालिका लोकप्रिय होत आहे. त्याचबरोबर अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या वतीने होणाऱ्या १०० व्या अखिल भारतीय मराठी विभागीय नाट्य संमेलनामध्ये होप फाउंडेशन निर्मित जिना इसी का नाम है या बालनाट्यात देखील श्रीशाने आपल्या अभिनयाची अविट छाप सोडली आहे.

सावेडीच्या श्री समर्थ विद्या मंदिर प्रशालेत इयत्ता पाचवीमध्ये शिकणाऱ्या या बालकलाकाराला वडील तसेच आई सौ. स्वप्नाली यांचे मार्गदर्शन लाभत आहे. महाराष्ट्र शासनाच्या राज्य नाट्य स्पर्धा, पंडिता रमाबाई यासारखी नाटके, विविध नाट्यछटा-एकपात्री अभिनय स्पर्धा याबरोबरच नृत्य, चित्रकला आदी कलांमध्ये कु. श्रिशा लहानपणापासून पारंगत असून अनेक पारितोषिके देखील प्राप्त झालेली आहेत.

तिची लहान बहीण कु. कृष्णाली सुद्धा विविध नाटिकांमध्ये अभिनयाचे काम करत आहे. श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे पदाधिकारी, प्रशालेचे प्राचार्य, पर्यवेक्षक, शिक्षक, पालक विद्यार्थी तसेच सिने नाट्यरसिकांनी कु. श्रिशाचे अभिनंदन व कौतुक केले आहे.




Admissions Open
For Nursery, LKG & UKG
Admission forms will be available from Monday 20th Jan. 2025 between 10.00 a.m to 3 p.m
Age Criteria for Admission (2025-26)
Nursery - Children should be born between 1st October 2021 to 31st Dec. 2022
LKG - Children should be born between 1st October 2020 to 31st December 2021
UKG - Children should be born between 1st October 2019 to 31st December 2020
SVES
Ahmednagar Sindhi Education Society's
(Linguistic Minority Educational Trust)
St. Vivekanand English School Pre - Primary
Tarakpur, Ahilyanagar. Ph. : 0241-2421999/2428866
Mrs. Kanchan Papdeja, Principal — Mr. Gopal Bhagwani, Secretary — Mr. Ramchand Menghani, President

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com


## नाट्यरसिकांसाठी दसरा-दिवाळी

बऱ्याच वर्षांनी म्हणजेच तब्बल २२ वर्षांनंतर आपल्या नगरीत अ. भा. नाट्य परिषदेचे १०० वे विभागीय नाट्यसंमेलन होत आहे. यानिमित्ताने तत्कालीन केंद्रीय मंत्री नाट्यरसिक स्व. दिलीप गांधी यांनी नियोजन केलेल्या अ.भा. नाट्य संमेलनाची आठवण झाली. अमरापूरकरांचे नेतृत्व, तेव्हाच्या अध्यक्षा किर्ती शिलेदार, मामा उर्फ भूमिपुत्र मधुकर तोरडमलांची झणझणीत नगरी टिका, खूष झालेला मोगॅबो, राजकीय व नाट्य अभिनेत्यांच मांदियळी खूप काहींचा साक्षीदार राहू शकलो.

या १०० वे विभागीय नाट्यसंमेलनाच्या नियोजनाप्रित्यर्थ नव्या नाट्यपिढीच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे नगरवासियांतर्फे अभिनंदन.

स्वागताध्यक्ष डॉ. बापूसाहेब कांडेकरांचे विशेष अभिनंदन. शारीरिक आरोग्यासह मानसिक आनंद, शांती, समाधानासाठी त्यांनी दाखवलेली कलारसिकता महत्त्वाची.

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१



महानगरपालिकेचेही आभार. कारण मुलभूत सेवा सुविधांसह नगरकरांच्या कला, क्रीडा, सांस्कृतिक उन्नतीसाठी सहकार्य करणे हेही महत्त्वाचे असते. कोणत्याही शहराचा व नागरिकांचा दर्जा तेथे होत असलेल्या सांस्कृतिक, नाट्य-कला चळवळीवर ठरतो. पुण्याला याबाबत वरचा क्रमांक मिळतो.

आपल्या नगरीतही नाट्यक्षेत्रातील नवीन पिढी काहीतरी करण्यासाठी धडपडत आहे. त्यांना सर्व क्षेत्रातील रसिक व दानशूरांनी सहकार्य करीत नित्य निरंतन हा यज्ञ चालू ठेवावा. आजपासून होणाऱ्या विविध कार्यक्रमांना, नाटकांना व मुख्य संमेलनास नगरकरांनी प्रचंड प्रतिसाद देऊन आपल्यालाही नाट्य-साहित्य कलेची भूक आहे हे दाखवून द्यावे. पुन्हा एकदा या नाट्य दिवाळीस आमच्याही शुभकामना.- किशोर गांधी (मुसाफिर)

# श्री रामनवमी मिरवणुकीस पुन्हा मूळ मार्गावरून परवानगी मिळवून द्या

### हिंदूराष्ट्र सेनेच्या शिष्टमंडळाची आ. संग्राम जगताप यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी

नगर - काही समाजकंटकांनी केलेल्या दगडफेकीमुळे पोलिस प्रशासनाने शहरातून श्री रामनवमी निमित्त काढण्यात येणाऱ्या मिरवणुकीच्या मार्गात बदल केलेला आहे. मिरवणूक पुन्हा शहरातील पारंपारिक मार्गावरून सुरु होण्यासाठी पोलिस आणि जिल्हा प्रशासनाकडून परवानगी मिळवून द्यावी, अशी मागणी हिंदूराष्ट्र सेनेच्या शिष्टमंडळाने आ. संग्राम जगताप यांच्या कडे निवेदनाद्वारे केली आहे.



श्री रामनवमी मिरवणुकीस पुन्हा मूळ मार्गावरून परवानगी मिळवून द्यावी या मागणीचे निवेदन आ.संग्राम जगताप यांना देताना हिंदूराष्ट्र सेनेचे कार्यकर्ते.

याबाबत हिंदूराष्ट्र सेनेचे शहर प्रमुख निखील धंगेकर, निलेश लखापती, निलेश रोकडे, प्रसाद भागवत, साहिल जरे, शिवराज शेरकर, धनंजय कांबळे, अनुपम कनोरे, ऋषीराज राऊत, संकेत वक्कल, रत्नम नराल, संदीप बोरुडे, योगीराज नेवसे, मयूर बोरुडे, सचिन पालवे यांच्या शिष्ट मंडळाने आ.जगताप यांची भेट घेत चर्चा केली. यावेळी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मागील एक तपापासून हिंदूराष्ट्र सेना नगर शहरामध्ये श्रीराम नवमी उत्साहात साजरी करत असते. या महोत्सवात सकल हिंदू समाज व हिंदू संघटना आणि रामभक्त सहभागी होत असतात. आपल्या हस्तेच मागील काही मिरवणुकांचा प्रारंभ झाला आहे. आपणही मोठ्या भक्ति भावाने त्यामध्ये सहभागी होऊन मिरवणूक यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केलेले आहेत.

वास्तविक पाहता श्री गणेश विसर्जन मिरवणूक व रामनवमी मिरवणूक आणि नगर शहरात सर्व राष्ट्रपुरुष, महामानवांच्या जयंतीनिमित्त निघणाऱ्या मिरवणुका एकाच मार्गाने वर्षानुवर्षे जात आलेल्या आहेत. महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या माळीवाडा बसस्थानकाजवळील पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आजपर्यंत आपल्या मिरवणुका सुरू झाल्या आहेत आणि त्यांची सांगता नगर शहराची दुसरी वेस असलेल्या दिल्ली दरवाजा येथे झालेली आहे. परंतु काही समाजकंटकांनी श्रीराम नवमी महोत्सवाच्या मिरवणुकांवर दगडफेक केल्यामुळे दंगल सदृश वातावरण निर्माण झाले होते. त्यातही हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांवरच सर्वाधिक गुन्हे दाखल होऊन अनेक तरुणांना पोलिसांच्या रोषाला आणि कायदेशीर संघर्षाला सामोरे जावे लागले. ही सर्व पार्श्वभूमी आपण जाणताच आहात. त्यामुळे पोलिसांनी दबाव निर्माण करून मिरवणुकीला परवानग्या नाकारल्या व अखेरीस मिरवणूक मार्गच बदलून आपण मिरवणूक यशस्वी पार पाडत परंपरा जपली. मात्र आतापर्यंत जे झाले, ते येथून पुढील काळात होऊ नये. आपण नगरचे प्रथम नागरिक म्हणून महापौरपद भूषवले आहे. तरुण लोकप्रतिनिधी म्हणून स्वतःस सिद्ध केले आहे. आपण स्वतः धार्मिक आहात आपल्या कुटुंबाला धार्मिक आस्थेची मोठे परंपराही आहे. यंदा महायुती म्हणून सर्व हिंदू समाजाने आपणास भरभरून मतदान केले आहे, ही बाब आपणही लक्षात घेतलेली आहे. आपल्याकडून हिंदू समाजाची विकासकामांसह धार्मिक कार्यातील सहभागाची अपेक्षा आणखी वाढीस लागली आहे.

### वेळप्रसंगी सत्तेचा अधिकार गाजवा

शहराचे लोकप्रतिनिधी म्हणून आम्ही तुमच्याकडे हट्टाने मागणी करित आहोत, की तुम्ही जातीने या प्रकरणात लक्ष घालून आणि श्री प्रभू रामचंद्रांच्या जयंतीच्या मिरवणुकीचा मूळ मार्ग हा पुन्हा मिळवून द्यावा. सत्ताधारी आमदार म्हणून आपण वेळप्रसंगी सत्तेच्या अधिकाराने पोलिस व महसुल प्रशासनाकडून मूळ मार्ग पुन्हा मिरवणुकीकारिता उपलब्ध करून घ्यावा. अधिकचा पोलीस बंदोबस्त लावल्यास समाजकंटकांवर नजर ठेवणे सोपे होईल. तसेच मिरवणुकीला आधीच परवानगी मिळाल्यास भविष्यातील न्यायालयीन संघर्ष टळेल व प्रशासन आणि कार्यकर्त्यांत समन्वायचे वातावरण राहील असेही या निवेदनात म्हटले आहे.



आकाशवाणी केंद्राला अहिल्यानगर नाव देण्याची मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने आकाशवाणीचे सहाय्यक निदेशक अभियांत्रिकी मानसी गारुडकर यांच्याकडे करण्यात आली. (छाया - लहू दळवी)

# आकाशवाणी केंद्राला अहिल्यानगर नाव द्या अन्यथा आकाशवाणी केंद्राला टाळे ठोकणार

नगर - आपल्या ऐतिहासिक शहराचे नामकरण अहिल्यानगर नावाने झालेले असल्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालय तसेच महानगरपालिकेनेही झालेल्या बदलाबाबत सर्वत्र माहिती दिलेली आहे. तरी देखील नगर शहर व जिल्हयाचा उल्लेख करताना आकाशवाणीकडून जुन्या नावाचा उल्लेख केला जातो हि बाब योग्य नाही. राज्य व केंद्र सरकारनेही अहिल्यानगर नावाला अधिकृत मान्यता दिलेली आहे. तरी आता आपल्याकडूनही झालेल्या बदलाची नोंद घेण्यात यावी, अशी अपेक्षा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने सहाय्यक निदेशक अभियांत्रिकी आकाशवाणी मानसी गारुडकर यांना निवेदनाद्वारे दिली आहे. आपल्या कार्यालयाच्या गेटवर सुद्धा अहिल्यानगर नावाचा उल्लेख होणे गरजेचे आहे मात्र जुन्याच नावाने उल्लेख असून तातडीने बदलून घेण्यात यावे अन्यथा दोन दिवसांमध्ये नगर शहराचा आणि जिल्हयाचा उल्लेख आपल्या रेडीओमध्ये अहिल्यानगर न झाल्यास आपल्या कार्यालयास टाळे ठोकण्यात येईल. पुढील उपाययोजना तातडीने करण्यात याव्या अन्यथा होणाऱ्या परिणामांची जबाबदारी आपली राहिल, असा इशारा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने कार्याध्यक्ष अभिजित खोसे यांनी दिला.

यावेळी जय भोसले, केतन क्षीरसागर, सुमित कुलकर्णी, महेंद्र उपाध्ये, राजूनाना तागड, तुषार यादव, मयूर सोमवंशी, रोहित सरना आदी उपस्थित होते.

# ॲग्रीस्टॅक नोंदणीसाठी शेतकऱ्यांनी विनामूल्य आधार जोडणी करुन घ्यावी : जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ

नगर - कृषी क्षेत्रात डेटा आणि डिजिटल सेवेचा वापर करुन कृषी योजनांचा शेतकऱ्यांना तातडीने लाभ देण्यासाठी ॲग्रीस्टॅक योजना राज्यात राबविण्यात येत आहे. या माहितीमधून शासनाच्या योजना प्रभावीपणे राबविण्यास मदत होणार असल्याने शेतकऱ्यांनी नोंदणीसाठी नजिकच्या सीएससी केंद्र, आपले सरकार केंद्र, सेतु केंद्र येथे जाऊन आपली आधार जोडणी विनामूल्य करुन घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी केले आहे.

शेतकऱ्यांना शेतातील हंगामी पिकांची आणि जमीन नकाशांची माहिती एका क्लिकवर उपलब्ध होण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाने कृषी योजनांसाठी ॲग्रीस्टॅक कार्डसाठी नोंदणी सुरु केली आहे. ॲग्रीस्टॅकद्वारे शेतकऱ्यांचा डेटा एकत्रित केला जाणार असून त्याआधारे कृषी क्षेत्रात डेटा आणि डिजिटल सेवेचा वापर करुन कृषी योजनाचा शेतकऱ्यांना लाभ होणार आहे. एकत्रित डेटाच्या आधारे विविध शेतीविषयक माहिती मिळाल्याने शासनाला त्वरित निर्णय घेणे सुलभ होणार आहे. तसेच जे लाभार्थी आणि गरजू शेतकरी आहेत, त्यांना वेळेवर मदत मिळण्यासाठी याचा उपयोग होईल.

या प्रकल्पाच्या माध्यमातून नवीन योजना सुरू करण्यासाठी शेतकरी संख्या आणि पिकांची आकडेवारी शासनाला तातडीने उपलब्ध होईल. शेतकरी आणि कृषी योजनांची आखणी करणे, त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी याचा वापर करण्यात येणार आहे. राज्य, विभाग, जिल्हा, तालुका आणि ग्रामस्तरीय समितीची निर्मिती करण्यात आली असून प्रत्येक गावामध्ये तलाठी, ग्रामसेवक आणि कृषी सहायक हे नोंदणी करणार आहे.

जिल्ह्यात एकूण ३ हजार ३१४ सीएससी सेंटर असून अकोले तालुक्यात १६० सीएससी सेंटर आहेत. जामखेड १७९, कर्जत २३६, कोपरगाव २२९, अहिल्यानगर ३२५, नेवासा ३५४, पारनेर २३६, पाथर्डी २२८, राहाता २०६, राहुरी २०५, संगमनेर ३१४, शेवगाव २६०, श्रीगोंदा १९२ तर श्रीरामपूर तालुक्यात १९० सीएससी सेंटर आहेत.



खासदार संजय राऊत यांनी नागा साधूंबद्दल केलेल्या वक्तव्याचा नगर शहरात शिवसेनेच्या वतीने निषेध नोंदवून, राऊत यांच्या प्रतिमेस जोडो मारण्यात येवून दिल्लीगेट वेस समोर झालेल्या या आंदोलनात हिंदू धर्मियांच्या भावना दुखावून साधू-संतांचा अपमान करणाऱ्या राऊत यांच्यावर कारवाईची मागणी केली.

# खासदार संजय राऊत यांच्या प्रतिमेस जोडो मारो आंदोलन

### काळे फासणाऱ्याला शिवसेनेच्यावतीने १ लाख रुपयाचे बक्षीस

नगर - खासदार संजय राऊत यांनी नागा साधू बद्दल केलेल्या वक्तव्याचा नगर शहरात शिवसेनेच्या वतीने निषेध नोंदवून, राऊत यांच्या प्रतिमेस जोडो मारो आंदोलन करण्यात आले. दिल्लीगेट वेस समोर झालेल्या या आंदोलनात संताप व्यक्त केला, तर हिंदू धर्मियांच्या भावना दुखावून साधू-संतांचा अपमान करणाऱ्या राऊत यांच्यावर कारवाईची मागणी केली.

शिवसेना उध्दव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी नुकतेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर निशाना साधताना कुंभ मेळ्यातील नागा साधूबद्दल हिंदू धर्मियांच्या भावना दुखावणारे बेताल वक्तव्याचा ठपका ठेवत शिवसेनेच्या (शिंदे गट) वतीने आंदोलन करण्यात आले. राऊत यांच्या प्रतिमेला जोडे मारुन ती पायाखाली तुडविण्यात आली. या आंदोलनात शहर प्रमुख सचिन जाधव, माजी महापौर शिलाताई शिंदे, माजी नगरसेवक पै. सुभाष लोंढे, अश्विनी जाधव, शोभना चव्हाण, तृप्ती साळवे, सलोनी शिंदे, युवा सेनेचे पै. महेश लोंढे, अमोल हुंबे, दिगंबर गेंट्याल, सुनिल लालबोंद्रे, रवी लालबोंद्रे, अभिषेक भोसले, रोहित पाथरकर, सचिन राऊत, नागेश शिंदे आदींसह सहभागी झाले होते.

सचिन जाधव म्हणाले की, संजय राऊत यांच्या बेताल वक्तव्याने ठाकरे सेना लयास गेलेली आहे. वारंवार महापुरुष व साधु-संतांबद्दल ते बेताल वक्तव्य करत आहे. त्यांनी नागा साधूबद्दल केलेल्या वक्तव्याने हिंदू धर्मियांच्या भावना दुखावल्या आहेत. साधू-संतांचा अपमान महाराष्ट्र सहन करणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तर राऊत यांना काळे फासणाऱ्याला १ लाख रुपयाचे बक्षीस शिवसेनेच्या वतीने त्यांनी जाहीर केले.

# महायुतीचाच मंत्री म्हणतोय देवेंद्र सरकार शापित

### खासदार नीलेश लंके यांचा गौप्यस्फोट

नगर - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्यातील सरकार हे शापित असल्याचे सरकारमधील मंत्रीच सांगत असल्याचा गौप्यस्फोट राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार नीलेश लंके यांनी केला आहे.

यासंदर्भात मंगळवारी खा. नीलेश लंके यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, हे माझे मत नाही तर महायुती सरकारमधील एका बडया मंत्र्याचे आहे. दरम्यान, खा. लंके यांनी केलेल्या या गौप्यस्फोटामुळे हा बडा मंत्री कोण याची चर्चा राज्यात सुरू झाली आहे.



खासदार नीलेश लंके यांनी नगरमध्ये पत्रकारांशी बोलताना देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकार शापित असल्याचे विधान त्यांच्याच सरकारमधील मंत्र्याने केल्याचा गौप्यस्फोट केला.

महायुती सरकार राज्यात सत्तेवर आल्यानंतर प्रदीर्घ कालखंडानंतर गेल्या शनिवारी विविध जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांच्या नावांची घोषणा करण्यात आली. विशेषतः नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्रीपद भाजपाचे नेते गिरीष महाजन यांच्याकडे तर रायगडच्या पालकमंत्रीपदाची जबाबदारी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या आदीती तटकरे यांच्याकडे सोपविण्यात आली. या दोन्ही जिल्हयातील पालकमंत्री पदे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला हवी होती. नाशिकमध्ये दादा भुसे तर रायगडला भरत गोगावले यांनी या पदांवर हक्क सांगितला होता. नाशिक तसेच रायगडचे पालकमंत्रीपद न मिळाल्याने एकनाथ शिंदे हे संतापून सातारा जिल्ह्यातील त्यांच्या दरे या गावी निघून गेले. शिंदे यांच्या संतापानंतर दोन्ही पालकमंत्र्यांच्या नियुक्तीला स्थगिती देण्यात आली. या पार्श्वभुमीवर खा. नीलेश लंके यांनी आपली भूमिका मांडली.

### ईव्हीएमच्या जोरावरचे सरकार टिकत नसते


महायुतीमधील एका बडया मंत्र्याने पत्रकारांशी खाजगीत बोलताना राज्यातील देवेंद्र सरकार शापित असल्याचे विधान केले आहे. ईव्हीएमच्या जोरावर निवडून आलेल्या लोकांना पाडण्याचे व पडलेल्या लोकांना निवडून आणण्याचे काम करण्यात आले आहे. ईव्हीएमच्या जोरावर सत्तेवर आलेले सरकार कधीही टिकत नसते.

### मुंडेंना शरद पवार यांचा विरोध

राज्यात महायुतीचे सरकार सत्तेवर असले तरी महाविकास आघाडी मात्र एकसंघ राहणार असल्याचा विश्वास खा. लंके यांनी यावेळी व्यक्त केला. धनंजय मुंडे यांना राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये प्रवेश देण्यास शरद पवार यांचा विरोध होता या जितेंद्र आव्हाड यांच्या विधानाचेही खा. लंके यांनी समर्थन केले. जितेंद्र आव्हाड हे आमच्या पक्षाचे नेते आहेत, त्यामुळे त्यांनी केलेल्या विधानात तथ्य असेल अशी पुष्टीही खा. लंके यांनी यावेळी बोलताना जोडली.

### जल जीवनमध्ये भ्रष्टाचार

जल जीवन मिशन योजनेअंतर्गत राबविण्यात आलेल्या जिल्ह्यातील पाणी योजनांमध्ये मोठा भ्रष्टाचार झाल्याचा खा. लंके यांनी पुनरूच्चार केला.यासंदर्भात आपण या खात्याचे मंत्री आर सी पाटील यांना निवेदन देऊन भ्रष्टाचाराकडे लक्ष वेधले आहे. माझ्या मतदारसंघात अनेक ठिकाणी ही योजना केवळ कागदावरच आहे. विशेषतः ज्या ठिकाणी या योजनेचे काम केवळ ६० टक्के पुर्ण झाले आहे तिथे ते ९० टक्के झाल्याचे भासविण्यात आले आहे. तसे व्हिडीओ आपल्याकडे आहेत. या योजनेची कामे देताना क्षमता नसतानाही ठेकेदारांना ही कामे देर्ण्यात आल्याचे लंके यांनी यावेळी बोलताना सांगितले.



### विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचा सन्मान

शांतिवन, आबू रोड (राजस्थान) महाराष्ट्र विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या आंतरराष्ट्रीय मुख्यालय माऊंट अबू भेटीमध्ये संस्थेच्या ओम् शांती मीडिया या पाक्षिकाच्या कार्यालयाला भेट दिली असता मुख्य संपादक राजयोगी बीके डॉ. गंगाधर यांनी त्यांचा सन्मान केला. यावेळी बीके डॉ. दीपक हरके उपस्थित होते.

## तरुणाने दिली होस्टेलमध्ये राहणाऱ्या तरुणीला धमकी

नगर - होस्टेल मध्ये राहणाऱ्या एका २१ वर्षीय तरुणीला फोन करून तू मला भेटायला ये, नाही आली तर मी तुझ्या कुटुंबियांना सांगून तुझी सर्वत्र बदनामी करील अशी धमकी एका तरुणाने दिल्याची घटना नगर शहरात एका महाविद्यालयाजवळ घडली. तरुणीने भेटायला येण्यास नकार दिल्याने त्या तरुणाने तिला फोनवर शिवीगाळ ही केली. या प्रकरणी सदर पिडीत तरुणीने २१ जानेवारीला सायंकाळी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी शेख (पूर्ण नाव माहिती नाही) याच्या विरुध्द बी.एन.एस.२०२३ चे कलम ३५१ (४) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.



कराचीवालानगर कॉलनी परिसरात मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट झाला असून त्यांचा बंदोबस्त करावा, असे निवेदन मनपा आयुक्तांना देताना आनंद राठोड आदी.

# मोकाट कुत्र्यांमुळे विद्यार्थिनी भयग्रस्त

### बंदोबस्त करण्याची मनपा आयुक्तांकडे मागणी

नगर - कराचीवालानगर कॉलनी, राधाबाई महिला कॉलेजच्या पाठीमागील एरियामध्ये मोकाट कुत्र्यांचा मोठ्या प्रमाणात सुळसुळाट झालेला आहे. त्यामुळे परिसरात येताना-जाताना रहिवाश्यांच्या अंगावर अचानकपणे कुत्रे धावून येतात. त्यामुळे कुत्रे चावण्याच्या भितीने विशेषत: वयस्कर लोक व महिला तसेच लहान मुले व कॉलेजला येणाऱ्या विद्यार्थिनी यांच्या मनात भितीचे वातावरण निर्माण झालेले आहे.

या मोकाट कुत्र्यांचा लवकरात लवकर बंदोबस्त करावा अशी मागणी शिवसेनेचे युवा सेना युवा अधिकारी आनंद राठोड यांनी महापालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

## जुन्या कलेक्टर ऑफिससमोर मुलीचा पाठलाग करून विनयभंग

नगर - शहरातील जुन्या कलेक्टर ऑफिस परिसरात असलेल्या पराग बिल्डींग समोर एका १६ वर्षीय तरुणीचा मोटारसायकल वर छुपा पाठलाग करत तिला रस्त्यात अडवून तिचा विनयभंग केल्याची घटना २१ जानेवारीला दुपारी ३.४० च्या सुमारास घडली.

सदर प्रकार आणि छेडछाड सुरु असताना पिडीत मुलीचे चुलते त्या रस्त्याने रिक्षा घेवून जात असताना त्यांना हा प्रकार दिसला त्यावेळी ते तेथे गेले असता छेडछाड करणारा तरुण पळून गेला. या प्रकरणी सदर पिडीत तरुणीने दिलेल्या फिर्यादी वरून कोतवाली पोलिसांनी बाबा बंगाली चौक परिसरात राहणाऱ्या युवकाविरुद्ध विनयभंगासह पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे.

## विमलबाई भंडारी यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर - पुणे येथील रहिवासी विमलबाई पोपटलाल भंडारी (वय ८५) यांचे २१ जानेवारी रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर इंदौर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या पश्चात १ मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. अहिल्यानगर येथील कुमार हिरालाल भंडारी तांदुळवाले यांच्या त्या काकू होत तर सुनील मुनोत (नेवासकर) यांच्या त्या आत्या होत.

## दुचाकीची चोरी

नगर-सिव्हील हॉस्पिटलच्या पार्किंग मध्ये मोटारसायकल लावून औषध आणण्याकरता गेलेल्या व्यक्तीची हिरो कंपनीची स्प्लेंडर प्लस मोटारसायकल (क्र.एम एच १६ बी टी ०१६२) कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेली. याप्रकरणी तोफखाना पोलिसांनी मयूर गंगाधर टकले (रा. गाडेकर चौक, निर्मलनगर, सावेडी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध बी.एन.एस.२०२३ चे कलम ३०५ (ब) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### घ्या नैसर्गिक व्हिटॅमीन डी

हिवाळ्यात योग्य वेळी उन्हात बसल्याने व्हिटॅमिन डीची कमतरता तर पूर्ण होतेच पण इतर अनेक आरोग्यदायी फायदेही मिळतात. यासाठी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत कधीही १५ ते ३० मिनिटे सूर्यप्रकाशात बसावे.

## पाककला

### पनीर गुलाबजाम

**साहित्य** – २५० ग्रॅम पनीर, १/२ चमचा बेकिंग पावडर, १ कप साखर, तळण्यासाठी तेल, २ चमचे मैदा, १/६ चमचा मीठ, २ कप पाणी

**कृती** – आधी पनीर हाताने चांगल्या प्रकारे मॅश करून घ्यावे. आता एका भांड्यात पनीर ठेवावे. पनीरमध्ये मैदा, मीठ, बेकिंग पावडर, साखर घालावी व हे मिश्रण चांगल्या प्रकारे मिक्स करावे.

आता पनीरचे छोटे गोळे बनवावे. कढईत तेल गरम करा आणि गुलाब जामुन सोनेरी होईपर्यंत तळून घ्यावे. आता एका पातेल्यात पाणी घालावे व उकळून घ्यावे. आता साखर घालावी व पाक तयार करावा. गॅस बंद केल्यानंतर पाकात थोडी वेलची घालावी व तळलेले गुलाब जामुन घालून साधारण ३ तास असेच ठेवावे. वरतून ड्रायफ्रूट्स घालू शकतात.

## वास्तू

### ब्रम्हतत्त्व कसे प्राप्त करावे?

✻ फक्त दिवाणखान्याची रचना वास्तूच्या मध्यभागी केली तर किंवा दोन फ्लॅट एकमेकांस जोडल्यानंतर मधली भिंत काढून टाकल्यास पूर्णपणे मोकळे ब्रम्हतत्त्व प्राप्त करणे शक्य होते.

✻ डायनिंग टेबल व पर्यायाने भोजनस्थान ब्रम्हतत्त्वात असू नये.

## सल्ला

कमी वयात मुलांना चष्मा लागला असेल तर दुधात, खडीसाखर, वेलची उकळून ते दूध प्यायला द्यावे यामुळे दृष्टी चांगली होते.

## सौंदर्य

नियोजित कार्यक्रमाच्या २ दिवस आधी मेंदी काढावी फार आधी काढल्यास ती टिकत नाही अथवा फिक्कट पडते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. २३ जानेवारी २०२५

**---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, पौष कृष्णपक्ष, विशाखा २९।०८, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. ३२ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : मानसन्मानाच्या क्षेत्रात वाढ होईल. कामात एखाद्याचे सहकार्य प्रगतीचे कारण बनेल.

**वृषभ** : आर्थिक विषयांमध्ये थोड्या अडचणी येऊ शकतात.

**मिथुन** : ठरविलेले काम पूर्ण करण्यासाठी काही प्रसंग प्रेरणादायी ठरतील.

**कर्क** : निष्कारण प्रश्नांचा त्रास राहील व्यापार व्यवसायात वेळ साधारण राहील.

**सिंह** : आजचा दिवस आपल्या कार्य–योजनेंसाठी विधायक ठरेल. मागील उधारी वसुल होईल.

**कन्या** : अधिक चांगली कामाची स्थिती आणि सामर्थ्य सिद्ध कराल.

**तूळ** : बेपवाई, बेशिस्त, योजनेच्या कार्यवाहीत खोळंबा निर्माण करू शकते.

**वृश्चिक** : सार्वजनिक जीवन बहुमूल्य राहील. देवाण–घेवाण कराल.

**धनु** : हितचिंतकांकडून व्यापारासंबंधी चांगला सल्ला मिळू शकतो.

**मकर** : आपल्या आवश्यकतेप्रमाणे इतर लोक आपल्या मदतीला येतील. मित्रांचे सहकार्य मिळेल.

**कुंभ** : प्रॉपर्टी संबंधी विषयांमध्ये वेळ उत्तम. कार्यात सहकार्यांचा सहयोग मिळेल.

**मीन** : आपल्या आर्थिक मुद्द्यांनुसार एखाद्याचे मन वळविणे कठिण होईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# हसा आणि शतायुषी व्हा!

### 'आदर्श गुप्तहेर'

गुप्तहेरांच्या बैठकीत अधिकाऱ्यांनी सूचना केली, आपले काम अत्यंत गुप्तपणे चालते. त्यांनी एका तरुण अधिकाऱ्याला सांगितले, तू अपार्टमेंटमध्ये जा. या अपार्टमेंटमध्ये मोहिते नावाचे अधिकारी आहेत. त्यांना ओळख पटविण्यासाठी आपला कोडवर्ड आहे ''आकाशात किती तारे आहेत?'' अधिकारी अपार्टमेंटमध्ये पोहोचल्यानंतर त्याच्या लक्षात येते, या अपार्टमेंटमध्ये मोहिते नावाचे दोघे जण राहतात. म्हणून त्याने अंदाज घेत पहिल्या फ्लॅटजवळ विचारले, ''आकाशात किती तारे आहेत? या फ्लॅटमधील गृहस्थ म्हणाले, आकाशातील तारेवाले गुप्तहेर अधिकारी मोहिते वरच्या मजल्यावर राहतात. मी मोहिते टेलर आहे.''

# जागतिक आश्चर्ये


### लेनार्डो दा व्हिन्सीचे पेंटींग

संत जॉन लिखीत बायबलमधील उतारा असे दर्शवितो की येशू ख्रिस्ताने त्याच्या शिष्यांसमवेत जे शेवटचे भोजन केले होते त्या सर्वांचे एकत्रित असे पेंटींग लेनार्डो द व्हिन्सीने काढले होते. त्या भोजना दरम्यान येशूने त्यांच्या १२ शिष्यांपैकी एकजण त्याला धरुन देवून शत्रूच्या स्वाधीन करणार आहे.

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# शब्दगंध क्र. ७०९८

सौ.शैलजा कुलकर्णी



**शब्दगंध क्र. ७०९७ चे उत्तर**



**आडवे शब्द :–** १) कमावून ठेवलेल्या रकमेतून खर्च करणे ४) संसार; प्रपंच ६) कोरा; न लिहिलेला (कागद) ८) वाघाचे ओरडणे १०) वडिलोपार्जित चालत आलेली जमीन वगैरे मालमत्ता ११) धनुष्य; धनुष्यासारख्या आकृतीचे बांधकाम १३) पॅसिफिक महासागर व ॲटलांटिक महासागर यांना जोडणारा कालवा १५) बरोबरी; तुलना; हार; माळ १६) नकला करणारा १९) आंदोलन; हालचाल २०) सूर्योदयानंतरचा काही कालावधी २१) साठ मिनिटांचा कालावधी; घंटा २२) आशीर्वाद; नवरामुलगा

**उभे शब्द :–** १) डोंगर; घाट २) स्वातंत्र्य; मुभा ३) भय; भीती ४) वांगे भाजून केलेले कालवण ५) ज्याला वतन आहे असा ७) काव्य; कविता ९) मांडणी; व्यवस्था १२) महत्त्व; तालुक्याचे वसुलाचे काम १३) ओळख १४) माणुसकी १५) शासन; गव्हर्नमेंट १७) मंदिर वगैरेचा सर्वोच्च भाग; शिखर १८) कडक पाठ असलेला एक जलचर

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : शरीर जेवढं फिरत राहिल तेवढं स्वस्थ राहतं आणि मन जेवढं स्थिर राहिल तेवढ शांत राहत.

# मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### छापखान्याची सुरुवात कशी झाली?

छपाईची सुरुवात होण्यापूर्वी माणसं हाताने ग्रंथ नकलून काढत असत. त्यामुळे पुस्तकाची एक प्रत तयार व्हायलाच दीर्घकाळ लागत असे. त्यामुळेच त्या काळात लेखन–वाचनाची व्हावी तशी प्रगती होऊ शकली नव्हती. चीनमध्ये नवव्या शतकात लाकडावर उलटी अक्षरे खोदून किंवा धातूच्या पत्र्यावर अक्षरे खोदून छपाई करण्यात येऊ लागली. पंधराव्या शतकात जोहान गुटेनबर्गने जर्मनीत पहिला छापखाना चालू केला. यात खूप सुधारणा करून विल्यम कॅकस्टनने इ. स. १४७६ मध्ये एक मुद्रणशाळा चालू केली. आजकाल बऱ्याच ठिकाणी संगणकाच्या सहाय्याने छपाई करण्यात येऊ लागली आहे. केवळ चार शतकांत छपाई कलेचा जगभर प्रसार झाला असून आज काही पुस्तकांच्या लक्षावधी प्रती निघू लागल्या आहेत.

### घमंडी राजा

एका राज्यात एक राजा राज्य करत असे. तो एका भव्य महलात राहत होता, जो मौल्यवान वस्तूंनी बनलेला होतं आणि ज्यामध्ये विविध कोरीव काम केले गेले होते. हा वाडा इतका सुंदर होता की त्याची चर्चा दूरवर पसरली होती. जवळच्या कोणत्याही राज्याच्या राजाला त्याच्या राजवाड्याशी तुलना करता येईल असा महाल नव्हता.

ज्याने राजाचा महाल पाहिला, त्याच्या स्तुतीचे पूल बांधले असतील. आपल्या महालाची स्तुती ऐकून राजाला स्वतःला आवरता आले नाही. हळूहळू त्याच्यात अभिमान निर्माण झाला. जो कोणी त्याच्या राजवाड्यात आला त्याने आपल्या वाड्याची स्तुती करावी अशी अपेक्षा होती. त्याच्या वाड्याची कोणी स्तुती केली नाही तर त्याला वाईट वाटायचे.

एकदा एक साधू त्याच्या दरबारात आला. साधूकडून शास्त्राचे ज्ञान घेतल्यानंतर राजा त्याला म्हणाला, ''गुरुवर ! तुम्ही आजची रात्र इथेच थांब. मी तुमच्या राहण्याची व्यवस्था करीन.'' ऋषींनी होकार दिला आणि उत्तर दिले, ''राजन! मी या सराईत नक्कीच राहीन.''

राजाच्या वाड्याला सराय म्हटल्यावर त्याचा अभिमान दुखावला गेला. तो रागाच्या भरात म्हणाला, ''गुरुजी! तुम्ही या राजवाड्याला सराय म्हणत अपमान करत आहात. दूरवर शोध घेतला तरी असा महाल सापडणार नाही. इथे राहणे हेच तुमचे सौभाग्य असेल, नाहीतर भटक्या साधूच्या नशिबात एक जीर्ण झोपडीही आली नसती. कृपया तुमचे शब्द परत घ्या.''

ऋषी हसले आणि म्हणाले, ''राजन! मी म्हणालो जे खरे आहे. मी माझे शब्द परत घेणार नाही. माझ्या दृष्टीने ही फक्त एक सराय आहे.''

''तसं असेल तर सिद्ध करा'' राजाने साधूला आव्हान दिले.

''ठीक आहे! माझ्या एका प्रश्नाचं उत्तर दे.'' राजा म्हणाला, ''विचारा!''

''तुमच्या आधी कोणाचा राजवाडा होता?''

''माझ्या वडिलांचा.''

''त्या आधी?''

''त्यांच्या वडिलांचे म्हणजे माझ्या आजोबांचा''

'' त्या आधी?''

त्यांच्या वडीलांचा !'' या वाड्याचा इतिहास खूप जुना आहे. राजाने सांगितले.

साधू म्हणाला, ''राजन, तुझ्या बोलण्यावरून हेच सिद्ध होते की हा राजवाडा एक सराय आहे, ज्यात तुझ्या पिढ्यान् पिढ्या राहत आहेत. जसे काही दिवस सरायात राहिल्यानंतर सोडावे लागते. एक दिवस तू ही सराय सोडशील, मग एवढा अभिमान कशाला?''

साधूचे म्हणणे ऐकून राजा खूप प्रभावित झाला. त्याच्या डोळ्यांवरचा अभिमानाचा पडदा उठला. तो हात जोडून साधूला म्हणाला, ''गुरुवर! आज तुम्ही मला सत्याचा सामना करायला लावलात. आता मी माझ्या अहंकारात बुडून गेलो होतो. मला क्षमा करा.''

साधूने राजाला क्षमा केली आणि त्या रात्री राजवाड्यात राहून दुसऱ्या दिवशी निघून गेले.

तात्पर्य : हे जग एका सरायसारखं आहे, जिथे लोक येतात आणि काही दिवस राहून निघून जातात.

# रहमते दर्शन (भाग – १)



### वे दुःख भंजन थे

मैं यह बात मानकर शीशगंज गुरुद्वारे पहुँचा और इधर–उधर देखा, परन्तु माँ तो कहीं नही थी। हाँ! एक सरदार जी ज़रूर खड़े थे। उन्होंने मुझे कुछ ढूँढते हुए देख कर पूछा, क्या ढूँढ रहे हो? मैंने सारा वृत्तांत कह सुनाया। उसने सारी बात सुनने के उपरांत मुझसे ऐसे बात की, मानो वह मुझे और मेरी माँ को पहले से ही जानता हो ।

उसने कहा, 'तुम्हारी माँ तो पहले ही सोनीपत जा चुकी हैं। तुम तो व्यर्थ ही उसे यहाँ ढूँढ रहे हो। मैंने कहा, उसके पास तो पैसे भी नहीं थे। वह सोनीपत कैसे गई होगी? उस सरदार जी ने कहा, मैंने अपने पास से उसे पैसे दे दिये थे। फिर मुझे वह सरदार जी नज़र नहीं आये। मैं उसकी इस बात पर यकीन करके अपने घर सोनीपत पहुँचा तो देखा कि मेरी माँ सकुशल वहाँ मौजूद थी।

अब मेरी जिज्ञासा इस बात में थी कि वह यहाँ कैसे पहुँची ? पूछने पर माता जी ने बताया कि अस्पताल से लेकर घर तक, महाराज जी उसके संग रहे और जहाँ भी पैसे वगैरह की ज़रूरत पड़ी, उसे देते रहे ।

उनकी मेहरबानियाँ तो बहुत हैं। इस जुबान से उनका वर्णन करना अत्यंत कठिन है। यही प्रार्थना है कि समर्थ सतगुरु का हाथ हमारे सिर पर सदा बना रहे और हमें उनके वचनों पर विश्वास आ जाये ताकि उनके आदेशनुसार भक्ति करके हम अपने निज घर सचखंड वापिस जा सकें।

मैं सन् १९८७–८८ में बीकानेर इ.ड.ऋ में नौकरी करता था। मैं यहाँ पर एक ऐसी घटना का ज़िक्र करना चाहता हूँ, जिससे पता लगता है कि दयाल पुरुष संत दर्शनसिंह जी महाराज अपने दीक्षितों की तो सहायता करते ही थे, बल्कि जो दीक्षित नहीं थे, उनकी भी वे संकट में सहायता करते थे। मेरा एक साथी हवलदार था, जिसका नाम उत्तमसिंह था और मेरे साथ ही नौकरी पर था। उसे दिल की तकलीफ थी। इसके लिए डॉक्टरों ने अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थान, दिल्ली में उसे जाँच कराने के लिए कहा। जाँच के बाद उसे (दिल का ऑपरेशन) कराने के लिए कहा गया। उसने दिल्ली से वापिस आकर मुझे इस बारे में बताया। मैं और उत्तमसिंह काफी अच्छे मित्र थे। उत्तमसिंह ने महाराज जी के बारे में सुना तो था मगर अभी नामदान नहीं मिला था और न ही उसने महाराज जी के दर्शन ही किये थे। वह ऑपरेशन से बहुत भयभीत था । एक बार जब वह जाँच कराने और ऑपरेशन की तारीख तय तो मैंने उसे अपने पास बिठाकर दयाल पुरुष कराने दिल्ली आने लगा, तुम दिल्ली महाराज दर्शनसिंह जी के बारे में कुछ बताया और कहा कि जाकर महाराज जी से ज़रूर मिलना और बताना कि महाराज जी! मुझे ऑपरेशन से बहुत डर लगता है। बाद में तुम महाराज जी से प्रसाद ज़रूर लेना । ऐसा करने से तम्हें कोई नुकसान नहीं होगा बल्कि फायदा ही होगा।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग – २)

### दिमाग की शक्ती

आप स्टेनोग्राफर या क्लर्क हैं तो दूसरों के सामने आराम नहीं कर सकते। आप अपने घर में टी.वी. आदि देखते हुए आराम कर सकते हैं। दोपहर के भोजन के बाद कम से कम १० मिनट आराम करें। यदि दोपहर को आराम नहीं लिया तो शाम को सोने से पहले एक दो घंटे आराम करें। शारीरिक काम करने वाले अधिक विश्राम करें तो अधिक कार्य कर सकते हैं। टेलर एक घंटे में २६ मिनट काम करता था और ३४ मिनट आराम। काम से ज्यादा आराम करता था। फिर भी दूसरों से चार गुणा अधिक काम करता था। इसलिये यदि आप बहुत शारीरिक परिश्रम करते हैं तो आराम कीजिए। यदि आप बहुत मानसिक परिश्रम करते हैं तब भी आराम

कीजिए। यदि आप स्मरण शक्ति को बढ़ाना चाहते हैं उस के लिये भी आराम कीजिए। आराम से मस्तिष्क में उचित मात्रा में रक्त प्रवाह होता है। आराम से असंख्य नाड़ी तंतुओं को शक्ति प्राप्त होती है। आराम से मस्तिष्क के विषैले पदार्थों का निष्कासन होता है। आराम से सोचने विचारने की शक्ति व एकाग्रता बढ़ जाती है। आराम से उदर प्रदेश में आवश्यक लाभ होता है। मधुर संगीत सुनने से भी आराम मिलता है। सेवा की भावना रखने से भी शरीर को आराम मिलता है। अच्छी पुस्तकें पढ़ने से भी आराम मिलता है। विश्राम मन की वह अवस्था है जिस में हम शांत रहते हुए भी तेजी से दौड़ सकते हैं। विश्राम करने से आप एकाग्र ही नहीं बल्कि मानसिक रूप से पैने भी बनते हैं। जो विश्राम प्राप्त कर सकता है वह बड़े नगरो के विजेता से भी महान है। राजयोग और सकारात्मक चिन्तन से तन और मन को आराम मिलता है। दिमाग का विकास

जो आप बनना चाहते हैं वह विकास खुद ब खुद नहीं हो जाता। इसे कोई दूसरा आप की खातिर करने वाला भी नहीं है। यदि आप चाहते हैं आप का जीवन बेहतर बने तो आप को खुद को बेहतर बनाना होगा। अपना जीवन बेहतरीन बनाते समय आप से हर रोज गलतियां होगी। गलतियों का स्वागत करते हुए उन्हें इस बात का संकेत मानें कि आप सही दिशा में हैं। जब आप आगे बढ़ते हैं तो सड़क कुछ दूर तक ही दिखाई देती है। यदि रास्ते को ज्यादा देखना चाहते हो तो उस सड़क पर यात्रा शुरू कर दें। बेहतरीन बनने के लिये कहीं से कोई प्रेरणा आप पर बिजली की तरह नहीं गिरेगी। कोई व्यक्ति या डाक्टर आप को इन्जेक्शन नहीं लगाएगा कि आप बेहतरीन बने । बेहतरीन बननें के लिये आप जो ठीक समझते हैं उसे कर दें। जिस कार्य का विचार आते ही अच्छा अच्छा लगे वह कर दें। वजन कम करना है तो सैर शुरू कर दें। ब्लड शुगर कम करनी है तो परहेज, सैर और सिर्फ हरी सब्जियां खाना शुरू कर दें। लेखक बनना चाहते हैं तो एक पेज हर रोज लिखना शुरू कर दें। कोई भी अच्छा

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

### नवजात बालकाची परिचर्या

बाळंतपणानंतर अंदाजे ३ ते ४ महिन्यांनी जास्तीचे वजन कमी होण्यासाठी ८ ते ९ महिने लागतात. हलकासा चालण्याचा व्यायाम, योगासने, सूर्यनमस्कार करावेत. पूर्वी वर्णन केलेल्या सूक्ष्म क्रिया, योगासने, प्राणायाम करावा. त्याच प्रमाणे योगासनांमध्ये पर्वतासन, शलभासन, भुजंगासन, धनुरासन, नौकासन, पवनमुक्तासन, गोमुखासन, उत्तानपादासन, सुलभ अनंतासन, सूर्यनमस्कार ही योगासने करावीत; यामुळे पोट, मांड्या, नितंब, कंबर येथील चरबी झडून तेथील स्नायू मजबूत व लवचीक होतात. तसेच गर्भाशयाचे आकुंचन होण्यासाठी, योनीमुख, मूत्रद्वार, गुदद्वार येथील स्नायू पूर्वावस्थेत येण्यासाठी सहजोली मुद्रा करावी. हे कसे करायचे याचा उल्लेख आपण मागील प्रकरणातील व्यायामाचे प्रकारात पाहिलेले आहे. आजच्या काळातील स्त्रिया बांधा बिघडू नये तसेच वाढलेले वजन कमी करण्यासाठी क्रश डाएट व भरपूर व्यायाम करतात; यामुळे शरीराची आणखीनच हानी होऊन वातप्रकोप होतो; त्यामुळे असे न करता आहार योग्य ठेऊन सोपी योगासने करावीत. या सर्व व्यायाम प्रकारामुळे वर्षभरात ८ ते १० किलो वजन कमी होऊन गर्भावस्थेच्या पूर्वी जसे शरीर असते तसेच शरीर पुन्हा प्राप्त होऊ शकते. गर्भावस्थेमध्ये बाळ हे आईच्या उदरात सुरक्षित असते. जेव्हा बाळाचा जन्म होतो तेव्हा त्याला बाहेरील वातावरण असुरक्षित वाटते; म्हणून बऱ्याच वेळेला प्रसूतीनंतर नवजात बाळ जेव्हा रडायचे थांबत नाही, तेव्हा आईच्या कुशीत बाळाला ठेवले किंवा मांडीवर दिले. तरी बाळ आपोआप रडायचे थांबते. आई व बाळाचे असे जन्मोजन्मांतराचे नाते असते. ज्या बाळाचे वजन अडीच किलो व त्यापेक्षा अधिक असते ते बाळ निरोगी समजावे. बाळामध्ये काही व्यंग नसेल तर त्याला निरोगी समजावे. बाळ जन्मल्याबरोबर रडणे आवश्यक असते, कारण रडण्याने बाळाची श्वास घेण्याची क्रिया चालू होते. श्वास घेतल्यावर बाळाच्या फुप्फुसातील प्राणवायू (ऑक्सिजन) रक्तात मिसळतो व बाळाची श्वासोच्छवासाची क्रिया लयबद्ध नियमित सुरू होते. जन्मतःच बाळ रडले नाही, तर त्याचा जीव धोक्यात आहे असे समजावे. अशा वेळी बाळाला पाठीवर हलकेच मारावे. असे केल्यामुळे बाळ रडू लागेल.

आयुर्वेदामध्ये बाळ जन्माला आल्यावर लगेचच एक संस्कार केला जातो. त्याला 'जातकर्म संस्कार' असे म्हणतात.

**जातकर्म संस्कार** : जन्मलेल्या बाळाच्या नाका–तोंडावर असलेला कफ कापसाने बाजूला करावा. त्याने बाळाला श्वास घेणे अवजड जात नाही. बाळाच्या नाका–तोंडातील कफ साफ केल्यावर बाळ रडायला लागते व त्याची श्वासोच्छ्वासाची क्रिया सुरू होते. एखाद्या वेळेस जर बाळ रडले नाही, तर बाळाच्या पाठीवर हलकेच मारावे किंवा पाणी शिंपडावे, यामुळे बाळ लगेचच रडायला लागते.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ–महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर

अहिल्यानगर मोबाईल नं– ८७९३४००४००

# जातीय सलोख्याचे वातावरण बिघडवणे चुकीचे आहे

**जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके**



अ. नगर जिल्हा अल्पसंख्यांक विभागाच्या बैठकीत बोलताना राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके आदी.

नगर – जिल्ह्यात सर्व धर्माचे लोक हे गुण्या गोविंदाने राहात आहेत. काही लोक मतांसाठी आपली राजकीय पोळी भाजण्यासाठी जातीय वादाचे विष पेरीत असतील तर हा पुरोगामी विचारसरणीचा जिल्हा कदापी सहन करणार नाही. कारण देशाचे नेते शरदचंद्र पवारांनी नेहमी सर्व भारतीयांची विशेषतः महाराष्ट्रात सर्व धर्माची एकी असणे ह्या साठी आपली पूर्ण हयात घातली आहे. आज सुद्धा ते संविधानाचे अग्रक्रमाने विचार करणारे नेते आहेत. पवारांनी कधीच जातीयवादाला खतपाणी घातले नाही व पक्षात अशा प्रवृत्तींना स्थान सुद्धा दिले नाही. त्यामुळे अल्पसंख्यांक समाजाने कसलीही मनात शंका न बाळगता गुण्यागोविंदाने आपले जीवन जगावे राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्ष हा नेहमी सर्वांना बरोबर घेऊन चालणारा पक्ष आहे. खासदार निलेश लंके हे पवारांच्या विचारांशी बांधील आहेत. त्यामुळे आपण सर्व जाती धर्माचे लोक गुण्या गोविंदाने नगर जिल्ह्यात राहात आहोत त्यामुळे काही मूठभर लोकांच्या नादी लागून आपण चुकीचे मार्ग स्वीकारु शकत नाही, असे आश्वासन जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके यांनी मार्गदर्शनपर भाषणात केले

अ. नगर जिल्हा अल्पसंख्यांक विभागाचे जिल्हा अध्यक्ष अथर खान यांनी अल्पसंख्यांक विभागाची आढावा बैठक मंगळवारी बोलवली होती. सदर बैठकीत अल्पसंख्यांक विभागाच्या पदाधिकाऱ्यांची मते जाणून घेऊन खान यांनी पक्षवाढीसाठी बहुमूल्य सूचना करून विविध विषयांवर सखोल चर्चा करून आपले मनोगत व्यक्त केले

यावेळी नगर शहर जिल्हा अध्यक्ष अल्तमश जरीवाला यांनी अ.नगर शहराशी निगडित अनेक मुद्दे मांडले. महापालिकेच्या दुटप्पी भूमिकेचा निषेध केला तसेच येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत विशेषतः अ.नगर महापालिकेच्या निवडणुकीकरिता पक्षाने कार्यकर्त्यांना बळ देऊन सहकार्य करावे, अशी मागणी जरीवाला यांनी केली.

जिल्हा उपाध्यक्ष समीर पठाण यांनी राहुरी मतदार संघातील मुद्दे उपस्थित केले. शहर जिल्हा कार्याध्यक्ष रियाज कुरेशी यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना सांगितले की शहरात अल्पसंख्यांक समाजाला टार्गेट करून राजकारण चालु आहे. हे शहरासाठी घातक आहे असे नमूद केले.

यावेळी श्रीगोंदा तालुका अध्यक्ष असीर शेख, नगर तालुका अध्यक्ष पापामिया पटेल, नगर उत्तर तालुका अध्यक्ष अल्ताफ शेख, पारनेर प्रभारी तालुका अध्यक्ष तोफीक पटेल, जिल्हा सचिव सौं. रुकया शेख, शहर सचिव अकिब सय्यद, नेवासा तालुकाध्यक्ष जुनेद शेख, शहर सरचिटणीस परवेज शेख, वाहतूक विभागाचे जावेद शेख फय्याज तांबोली, किशोर काळे आदी उपस्थित होते.

यावेळी भिंगार शहर अल्पसंख्यांक उपाध्यक्षपदी रेश्मा साठे, नगर तालुका उपाध्यक्षपदी दशमीगव्हाणच्या सौ. शबाना सय्यद यांची निवड करण्यात आली.



श्री नवनाथ युवा मंडळ निमगाव वाघा यांच्यावतीने राजमाता जिजाऊ नारीशक्ती राज्यस्तरीय पुरस्काराने प्रा.अनुरीता झगडे यांचा गौरव करण्यात आला.

# राजमाता जिजाऊ नारीशक्ती राज्यस्तरीय पुरस्काराने प्रा.अनुरीता झगडे यांचा गौरव

नगर – निमगाव वाघा येथील परिवार मंगल कार्यालय येथे स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ जयंती निमित्त व राष्ट्रीय युवा सप्ताह निमित्त श्री नवनाथ युवा मंडळ निमगाव वाघा, ता.जि.अ.नगर यांच्यावतीने सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल राजमाता जिजाऊ नारीशक्ती राज्यस्तरीय पुरस्काराने प्रा.अनुरीता झगडे यांचा शाल, सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

याप्रसंगी प्रमुख उपस्थितीत साहित्यिक ज्ञानदेव पांडुळे, कवियत्री सरोज आल्हाट, युवा मंडळाचे अध्यक्ष संदिप डोंगरे, प्रमुख पाहुणे म्हणून ज्ञानदेव लंके, मुख्याध्यापिका अनिता काळे, गझलकार रज्जाक शेख, स्व.पै.किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्थेचे अध्यक्ष तथा निमगाव वाघा चे ग्रामपंचायत सदस्य पै.नाना डोंगरे आदींसह कवी, साहित्यिक व ग्रामस्थ उपस्थित होते.



स्नेहालय इंग्लिश मिडीयम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी कला विषयात उत्कृष्ट यश संपादन केले.

# स्नेहालय इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांचे कला विषयातील परीक्षेत उत्कृष्ट यश

नगर – स्नेहालय इंग्लिश मिडीयम स्कूल मधील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासाबरोबर शैक्षणिक गुणवत्ता वाढीवर भर देण्यासाठी विविध उपक्रम आयोजित केले जातात. शाळेतील विविध कला विभाग, जसे की खेळ, चित्रकला, आणि संगीत, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. यावर्षी, २०२४–२५ मध्ये शासकीय इलीमिंटरी आणि इंटरमिजीएट चित्रकला परीक्षेला १५ विद्यार्थी बसले होते. सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत, ज्यामुळे त्यांना एस.एस.सी बोर्ड परीक्षेत वाढीव गुण मिळवण्याची संधी मिळेल.

या यशाबद्दल शाळेचे मानद संचालक राजेंद्र शुक्रे, स्नेहालय अनिवासी प्रकल्प विभागाचे संचालक हनिफ शेख आणि शाळेच्या मुख्याध्यापिका वीणा मुंगी यांनी विद्यार्थ्यांचा गौरव करत त्यांना प्रशस्तीपत्र देऊन अभिनंदन केले.

# आनंद देणारे ‘कला’ प्रभावी माध्यम

**संजय दळवी यांचे प्रतिपादन; शासकीय ग्रेड चित्रकला परीक्षांचा निकाल शंभर टक्के; ए श्रेणीत उत्तीर्ण विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप देण्यात येणार**



अशोका आर्ट इन्स्टिट्यूटच्या शासकीय ग्रेड चित्रकला परीक्षांचा निकाल शंभर टक्के लागला असून विद्यार्थ्यांना फोटोग्राफर संजय दळवी यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले.

नगर – कला कोणतीही असो ती आनंद देते. सर्व ललित कलांची निर्मिती ही मुळात समाजात आनंद निर्मितीसाठीच झालेली असून कला अभ्यासाने जीवन समृद्ध होते असे प्रतिपादन नगरमधील फोटोग्राफर संजय दळवी यांनी शासकीय चित्रकला परीक्षेत विशेष यश संपादित विद्यार्थ्यांच्या सन्मान समारंभ प्रसंगी केले. या परीक्षा कला क्षेत्रात प्रवेशासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. इन्स्टिट्यूटच्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करतांनाच ही कला इन्स्टिट्यूट शहरातील कलात्मक वातावरण जपत आहे. विद्यार्थ्यांच्या हिताचे कला उपक्रम अशोका आर्ट गॅलरीमध्ये नियमित राबवीत आहेत हे आवर्जून सांगितले.

अशोका आर्ट इन्स्टिट्यूटच्या शासकीय ग्रेड चित्रकला परीक्षांचा निकाल शंभर टक्के लागला असून विद्यार्थ्यांना संजय दळवी यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी अशोक डोळसे, संचालिका सौ.हर्षदा डोळसे, सन्मान डोळसे, सौ.प्रीती काठेड, कु.भक्ती चौधरी आदी उपस्थित होते.

सौ. हर्षदा डोळसे यांनी स्वागत करून इन्स्टिट्यूट मार्फत राबविण्यात येणाऱ्या कला उपक्रमांची माहिती दिली. इन्स्टिट्यूट मार्फत विविध लोककलांच्या कार्यशाळा कला प्रात्यक्षिके पर्यावरण पूरक गणपती बनवा कार्यशाळा टाकाऊतून टिकाऊ निर्मिती कार्यशाळा देश प्रेम पर्यावरण वाचवा वृक्ष वाचवा आधी सामाजिक विषयावर पोस्टर चित्र स्पर्धांचे आयोजन इन्स्टिट्यूट मार्फत करण्यात येते. या परीक्षांना प्रथम परीक्षेत अ श्रेणी मिळविणार्या विद्यार्थ्यांसाठी इन्स्टिट्यूट मार्फत पुढच्या वर्षीपासून विशेष कला स्कॉलरशिप देण्यात येणार आहे. कलाक्षेत्रातील महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी आवश्यक एम. एच. ए ए सीईटी., बी.एफ.ए., एम.एफ.ए., एन.आय.डी.,नाटा, इंटेरियर डिझाईन, फॅशन डिझाईन, ग्राफिक डिझाईन इ. कला क्षेत्रातील प्रवेश परीक्षांसाठी मार्गदर्शन करण्यात येते.

परिचय व सन्मान अशोक डोळसे यांनी केला. कु. भक्ती चौधरी हिने आभार मानले. कार्यक्रमात पालक, विद्यार्थी उपस्थित होते.



शिक्षकांसमवेत शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षेत यशस्वी झालेले चितांबर शाळेचे यशस्वी विद्यार्थी.

# चितांबर शाळेचा शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षांचा निकाल शंभर टक्के

नगर – नव विद्या प्रसारक मंडळाच्या महर्षी ग. ज. चितांबर शाळेने शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षा एलिमेंटरी व इंटरमिजिएट या परीक्षांच्या शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. शाळेत यावर्षी एलिमेंट्री परीक्षेसाठी २५ तर इंटरमिजिएट परीक्षेसाठी २४ विद्यार्थी बसले होते. सर्वच्या सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विद्यार्थ्यांना शाळेतील कलाशिक्षक अरूण इघे यांनी मार्गदर्शन केले.

नव विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. रवींद्र साताळकर, मानद सचिव निलेश वैकर, संस्थेचे सर्व पदाधिकारी त्याचबरोबर विद्यालयाच्या मुख्याध्यापिका विभावरी रोकडे, पर्यवेक्षिका मंदा शिंदे यांनी अभिनंदन केले आहे.

# ६४ व्या महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शनात महेश गायकवाडने पटकाविले द्वितीय क्रमांक

नगर – निमगाव वाघा (ता. नगर) येथील महेश विजय गायकवाड याने नागपूर येथे झालेल्या ६४ व्या महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शन (विद्यार्थी विभाग) २०२४–२५ स्पर्धेत राज्यात दुसरा क्रमांक पटकाविला. त्याचा गावात एकता फाऊंडेशनच्या वतीने सन्मान करण्यात आला.

एकता फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा सोसायटी सदस्य अतुल फलके यांनी महेश गायकवाड याचा सत्कार केला.



६४ व्या महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शनात महेश गायकवाड याने द्वितीय क्रमांक पटकाविल्याबद्दल त्याचा गावात एकता फाऊंडेशनच्या वतीने सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी पोलीस निरीक्षक छगन कापसे, डॉ. विजय जाधव, जालिंदर आतकर, पिंटू जाधव, गोरख शिंदे, गणेश गायकवाड, अनिल डोंगरे, विजय गायकवाड आदी उपस्थित होते.

# आजच्या विद्यार्थ्यांनी देश समजून घ्यायला हवा

**इतिहास अभ्यासक भुषण देशमुख यांचे प्रतिपादन; पीएमश्री छावनी परिषद शाळेत व्याख्यानाचे आयोजन**

भिंगार – स्वातंत्र्यपुर्व काळातील आंदोलने, देशवासीयांनी स्वातंत्र्याकरिता केलेला संघर्ष, परकियांशी संघर्ष करताना आंदोलकांच्या कुटूंबियांना सहन कराव्या लागलेल्या यातना अशा सर्व घटनांचा शालेय विद्यार्थ्यांनी मागोवा घ्यायला हवा. विद्यार्थ्यांनी शालेय दशेतच देश समजून घ्यायला हवा, असे प्रतिपादन इतिहासाचे अभ्यासक भुषण देशमुख यांनी पीएमश्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळेत आयोजित मार्गदर्शनपर व्याख्यानात केले.



पीएमश्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर व्याख्यान करताना भूषण देशमुख.

व्याख्यानाच्या सुरूवातीला सुभाष भारूड यांनी स्वागत केले. मुख्याध्यापक संजय शिंदे व राजू भोसले यांनी संविधानाची प्रत व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला.

देशमुख पुढे म्हणाले, स्वातंत्र्याच्या आंदोलनात भिंगार शहराचे खूप मोठे योगदान होते. भिंगारच्या परिसरात अनेक ऐतिहासिक वास्तू आहेत. त्या प्रत्येक वास्तूला तुम्ही भेट देऊन तिचा इतिहास समजून घ्यायला हवा. भुईकोट किल्ला, फराहबक्ष महाल, चाँदबीबीचा महाल, शुक्लेश्वराचे पुराण मंदिर, ऐतिहासिक टँक म्युझियम, दमडी मस्जिद अशा अनेक वास्तूंमुळे भिंगारला ऐतिहासिक महत्व आहे.

स्वातंत्र्याच्या आंदोलनात भिंगारमधील अनेक आंदोलकांचा सक्रिय सहभाग होता. सरोष थिएटर मध्ये बॉम्बस्फोट घडवून आणणारे क्रांतिकारक भिंगारमधील होते. म्हणून ज्या भागात राहतो त्या भागाचा इतिहास आपल्याला माहित असायला हवा.

देशमुख यांनी स्वातंत्र्याच्या आंदोलनातील विविध पैलुंवर प्रकाश टाकत अनेक घटनांची पाने विद्यार्थ्यांसमोर उलगडली. तसेच स्वातंत्र्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेल्या संविधानाचे महत्व विद्यार्थ्यासमोर विषद केले. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळेचा पीएमश्री शाळेत समावेश झाल्यामुळे शाळेत विविध उपक्रमांचे आयोजन करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा होईल. याबाबत शाळा प्रयत्नशील असल्याचे मुख्याध्यपक संजय शिंदे यांनी आभार व्यक्त करताना सांगीतले.

# राज्यस्तरीय कर्णबधिर चॅम्पियनशिप कुस्ती, ज्युडो स्पर्धेत नुरमोहम्मद शेखला सुवर्णपदक

नगर – महाराष्ट्र स्पोर्ट कौन्सिल ऑफ दि डेफ यांच्यातर्फे ठाणे येथे नुकत्याच झालेल्या १४ व्या राज्यस्तरीय कर्णबधिर सिनियर चॅम्पियनशिप कुस्ती स्पर्धेत अहिल्यानगरचा नुरमोहम्मद बुढनभाई शेख याने फ्रीस्टाइल ९७ किलो कुस्ती, ग्रीको–रोमन ९७ किलो कुस्ती, १०० किलो पुरुष ज्युदो या तिन्ही प्रकारच्या स्पर्धेत सुवर्ण पदक मिळवून दिले. या स्पर्धेत राज्यातील कर्णबधिर महिला, पुरुष दोन्ही सहभागी होते त्याची निवड चेन्नई येथे होणाऱ्या नॅशनल कुस्ती आणि ज्युडो स्पर्धेत झाली



राज्यस्तरीय कर्णबधिर चॅम्पियनशिप कुस्ती, ज्युडो स्पर्धेत नुरमोहम्मद शेखला सुवर्ण पदक मिळाले.

या यशाबद्दल अहिल्यानगर कर्णबधिर मित्रमंडळतर्फे नुरमोहम्मद शेख याचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी अपंग राज्य पुरस्कार सन्मानित विजेते अजय गांधी, तलाठी बबलू बल्लाळ, आंतरराष्ट्रीय मानांकन बुद्धीबळ खेळाडू देवेंद्र वैद्य, कृष्णा क्षीरसागर यांनी नुरमोहम्मद शेख याचे अभिनंदन केले आणि त्याला पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.



आनंद योगा सेंटरचे प्रवर्तक अनिल मेहेर यांच्या लग्नाचा वाढदिवस व हळदी कुंकू कार्यक्रमात सहभागी झालेले ज्येष्ठ नागरिक.

# आनंद योगा सेंटरमध्ये हळदी कुंकू कार्यक्रम उत्साहात

नगर – आनंदऋषीजी हॉस्पिटल येथील आनंद योगा सेंटरचे मुख्य प्रवर्तक अनिल मेहेर व सौ. अर्चना मेहेर यांच्या लग्नाचा ३५ वा वाढदिवस साजरा करण्यात आला. अनिल मेहेर मागील ३४ वर्षांपासून नित्य नियमित योगा क्लास विनामुल्य चालवित आहेत.

अहिल्यानगरमधील सावेडी येथील माय टिफीनचे व्यवस्थापकीय संस्थापक हेमंत लोहगावकर उर्फ हेमंत दादा हे या कार्यक्रमाचे मुख्य अतिथी होते. या प्रोग्रामचे संपुर्ण सुत्रसंचलन सौ. निता जाधव यांनी केले तर परिचय राजेन्द्रप्रसाद सिकची यांनी केला.

यावेळी हेमंत लोहगावकर उर्फ हेमंत दादा यांनी त्यांचे भाषण करताना माय टिफीन या व्यवसायाची जबाबदारी सांभाळताना बऱ्याच ज्येष्ठ नागरिकांच्या अनेक प्रकारच्या समस्या त्यांच्या लक्षात आल्या होत्या. ‘आधार आपुलकीचा’ या नावाने त्यांनी हॉटस्पॉट ग्रुप तयार केला. त्यामध्ये जवळ–जवळ ११०० सदस्य आहेत. त्यामध्ये ज्येष्ठ लोकांना काही पाहिजे असल्यास अनेक प्रकारच्या समस्या त्यांनी सोडविण्याचा प्रयत्न करीत आहे. लवकरच ते ‘आनंदी शाळा’ या नावाची कार्यशाळा सुरु करणार आहेत.

या प्रोग्राममध्ये आनंदऋषीजी योगा सेंटरच्या सर्व सभासदांना आनंदाने अनिल मेहेर सरांचा लग्नाचा वाढदिवस साजरा केला. त्याच वेळेस सक्रांती निमित्त हळदी–कुंकवाचा प्रोग्राम चांगल्या प्रकारे साजरा केला. तसेच योग्य प्रकारे फोटोग्राफी / व्हिडीओ करीता दिपक नवले व अरुण गाडीलकर यांनी काम केले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी हेमा पडोळे, सुनिता परभणे, उज्वला नवले, ज्योती खताळ, सुनिता गुगळे, शैलजा सिकची, रंजना रिसे, सारिका बडेरा, सुरेखा ताकपेरे, वैशाली फुलसौंदर, घुले शुभदा, आशा गांधी, निता शहा, आशा पालवे, गिरवले वहिनी, वैशाली वाघसकर, शृतिका घुले या भगिनींनी विशेष प्रयत्न केले. सतिष पडोळे यांनी आभार प्रदर्शन केले.

# भगवा सप्ताहाने स्व.बाळासाहेब ठाकरे जयंती साजरी होणार

## शिवसेनेच्यावतीने विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन

नगर – शहरात शिवसेनेच्या वतीने शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांची जयंती भगवा सप्ताह म्हणून साजरी केली जाणार आहे. या पार्श्वभूमीवर मंगलगेट येथील शिवसेनेच्या शहर संपर्क कार्यालयात नियोजन बैठक पार पडली. या सप्ताहाचा प्रारंभ २३ जानेवारीला स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती दिनी होणार असून, सात दिवसात दररोज दोन सामाजिक उपक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे.



शिवसेनेच्या वतीने शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांची जयंती भगवा सप्ताह म्हणून साजरी केली जाणार आहे. या पार्श्वभूमीवर मंगलगेट येथील शिवसेनेच्या शहर संपर्क कार्यालयात नियोजन बैठक पार पडली. या बैठकीप्रसंगी जिल्हाप्रमुख अनिल शिंदे, बाबुशेठ टायरवाले, सचिन जाधव, दिलीप सातपुते, सुनिल लालबोंद्रे आदी पदाधिकारी.

या बैठकीप्रसंगी जिल्हाप्रमुख अनिल शिंदे, बाबुशेठ टायरवाले, शहर प्रमुख सचिन जाधव, जिल्हा संपर्कप्रमुख दिलीप सातपुते, भिंगार शहर प्रमुख सुनिल लालबोंद्रे, माजी नगरसेवक दिपक खैरे, अनिल लोखंडे, प्रशांत गायकवाड, दत्ता जाधव, युवा सेना जिल्हाप्रमुख योगेश गलांडे, शहर प्रमुख महेश लोंढे, अभिषेक भोसले, अमोल हुंबे, दिगंबर गेंट्याल, काका शेळके, प्रा. विशाल शितोळे, आनंद वाळके, सुनिल भिंगारदिवे, रविंद्र लालबोंद्रे, विजय चव्हाण, शोभना चव्हाण, महिला आघाडीच्या शहर प्रमुख पुष्पाताई येळवंडे, तृप्ती साळवे, सलोनी शिंदे, शोभना चव्हाण, अंगद महानवर, आशिष शिंदे, भारत कांडेकर, हनिफ शेख, अविनाश भिंगारदिवे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

अनिल शिंदे म्हणाले की, जाहिरातबाजी करण्यापेक्षा शिवसैनिक सामाजिक कार्याने स्व. बाळासाहेब ठाकरे यांची जयंती साजरी करणार आहे. सर्वसामान्यांना आधार देण्याच्या उद्देशाने सामाजिक उपक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे. बाळासाहेबांनी दिलेला समाजकारणाचा वैचारिक वारसा पुढे घेऊन जाण्याचे कार्य शिवसैनिक करत आहे. या संपूर्ण सप्ताहात विविध कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

सचिन जाधव म्हणाले की, पूर्वीच्या शिवसेनेने स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचाराला तडा दिल्याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेनेची वाटचाल सुरु आहे. स्व. बाळासाहेबांचे विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहचविण्याचे कार्य केले जात आहे. वंचित, उपेक्षित, कष्टकरी व दुर्लक्षीत घटकांचे प्रश्न सोडविण्याचे काम शिवसेना करत आहे. शहरात साजरा होणारा भगवा सप्ताह सर्वसामान्यांना आधार देणारा ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

दिलीप सातपुते यांनी सामाजिक उपक्रमांनी स्व. बाळासाहेब ठाकरे यांची जयंती साजरी होत असताना, विविध ठिकाणी शाखा उद्घाटन केले जाणार आहे. या जयंतीच्या माध्यमातून संपूर्ण शहर भगवेमय होणार आहे. सर्वसामान्यांनी शिवसेनेच्या आरोग्य शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीच्या भगवा सप्ताहनिमित्त पांजरपोळ गो शाळा येथे चारा वाटप, रिमांड होम, केडगाव येथील सावली संस्था, स्नेहालय, एमआयडीसी येथील मूकबधिर विद्यालय तसेच बेवारस मतीमंदाचा सांभाळ करणाऱ्या अरणगाव रोड येथील सावली प्रकल्पात फळ, अन्नधान्य व अल्पोपहाराचे वाटक केले जाणार आहे. तसेच नगर–कल्याण रोड व भिंगार येथे आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. संपूर्ण सात दिवस शिवसैनिकांच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम सुरु राहणार असल्याची माहिती शिवसेनेच्या वतीने देण्यात आली.



अहिल्यानगर जिल्हा नेत्र संघटनेच्या अध्यक्षपदी डॉ. रावसाहेब बोरुडे व सचिवपदी डॉ. राजीव चिटगोपेकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. (छाया – समीर मन्यार)

# अहिल्यानगर जिल्हा नेत्र संघटनेच्या अध्यक्षपदी डॉ.रावसाहेब बोरुडे, सचिवपदी डॉ.राजीव चिटगोपेकर

नगर – अहिल्यानगर जिल्हा नेत्र संघटनेच्या अध्यक्षपदी डॉ. रावसाहेब बोरुडे व सचिवपदी डॉक्टर डॉ. राजीव चिटगोपेकर यांची निवड करण्यात आली. अहिल्यानगर जिल्हा नेत्र संघटनेच्या नुकत्याच झालेल्या मीटिंगमध्ये सर्वानुमते ही निवड करून नूतन कार्यकारणीची निवड करण्यात आली. यामध्ये उपाध्यक्षपदी डॉ. दीपा मोहोळे, सहसचिव डॉ. प्रफुल्ल चौधरी, खजिनदार डॉ. प्रकाश रसाळ, सहखजिनदार डॉ. स्मिता पठारे यांची निवड करण्यात आली. नूतन कार्यकारणीला माजी अध्यक्ष डॉ. दिलीप फाळके यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ. प्रमोद कापसे, डॉ. अनिल सिंग, डॉ. उमेश सुद्रिक, डॉ. किशोर बधे, डॉ. विनोद येनगे तसेच जिल्ह्यातील सर्व नेत्रतज्ञ उपस्थित होते.

डॉ. बोरुडे व डॉ. चिटगोपेकर म्हणाले, सर्व नेत्रतज्ञ डॉक्टरांनी आमच्यावर जो विश्वास दाखवला आहे. त्या विश्वासास पात्र ठेवून आम्ही सर्व कार्यकारणी सर्वांना बरोबर घेऊन काम करून नवनवीन उपक्रम राबवू विविध शिबिराच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपत समाजाभिमुख काम करू असे ते म्हणाले.

डॉ. दिलीप फाळके यांनी मागील वर्षी राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

सूत्रसंचालन श्वेता भालसिंग यांनी केले. आभार डॉ. राजीव चिटगोपेकर यांनी मानले.

# यशस्वी उद्योजिका पुरस्काराने सुजाता देवळालीकर यांचा गौरव



नगर – शहरातील मेकअप आर्टिस्ट सुजाता सचिन देवळालीकर यांना जय युवा स्वयंसेवी संस्थेच्या वतीने यशस्वी उद्योजिका पुरस्काराने गौरविण्यात आले. नुकतेच झालेल्या सावित्री ज्योती महोत्सवात खासदार निलेश लंके यांच्या हस्ते देवळालीकर यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

बी.कॉम. पदवीधर ते ब्युटी थेरपीस्ट, ब्युटी कल्चर, कॉस्मेटॉलॉजिस्ट, ट्रिकोलॉजिस्ट, स्किन स्थेटीक्स एक्स्पर्ट, मेकअप एड हेअर आर्टिस्ट होण्यापर्यंतचा टप्पा त्यांनी गाठला आहे. मागील २४ वर्षापासून त्या क्षेत्रात योगदान देत असून, त्या यशस्वी महिला उद्योजिका म्हणून पुढे आल्या आहेत. स्वतःच्या अकॅडमीच्या माध्यमातून वेगवेगळे प्रशिक्षण वर्ग घेऊन मुली व महिलांना त्या स्वतःच्या पायावर उभे करण्याचे काम करत आहे. गरजू मुलींना विनामूल्य प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगार देखील उपलब्ध त्यांनी करुन दिला आहे. ग्रामीण भागांत जाऊनही त्या महिलांना प्रशिक्षण देण्याचे काम करत आहे. या कार्याची दखल घेऊन त्यांना यशस्वी उद्योजिका पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सौंदर्य क्षेत्राला आणखी प्रतिष्ठा मिळावी व महिलांना रोजगारांच्या संधी निर्माण करुन देण्याच्या उद्देशाने या क्षेत्रात सातत्याने कार्यरत राहणार असल्याची भावना देवळालीकर यांनी व्यक्त केली.

पुरस्काराबद्दल सुवर्णकार समाज संघटना, महाराष्ट्र असोसिएशन ऑफ एनजीओ (मँगो) चे अध्यक्ष प्रा. डॉ. रमेश वाघमारे आदींसह समाजातील सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे.

# नगर शहरात २४ जानेवारी रोजी अहिल्यानगर पेन्शनर्स असोसिएशनचे त्रैवार्षिक अधिवेशन

नगर – सेवानिवृत्त शिक्षकांची संघटना असलेल्या अहिल्यानगर पेन्शनर्स असोसिएशनच्यावतीने २४ जानेवारी रोजी त्रैवार्षिक अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर त्रैवार्षिक अधिवेशनाचे उद्घाटन सकाळी ११ वाजता शहरातील टिळक रोड, लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात होणार असून, या अधिवेशनासाठी संघटनेच्या सर्व सेवानिवृत्त शिक्षकांना सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष द. मा. ठुबे व सरचिटणीस बन्सी उबाळे यांनी केली आहे.



अहिल्यानगर पेन्शनर्स असोसिएशनचे त्रैवार्षिक अधिवेशनासंदर्भात बैठक नुकतीच पार पडली.

त्रैवार्षिक अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर नुकतीच संघटनेच्या शहर कार्यालयात नियोजन बैठक पार पडली. यावेळी कार्यालयीन चिटणीस ए. गो. इथापे, अशोक ढसाळ, तालुका अध्यक्ष सूर्यभान काळे, तालुका सहचिटणीस बबन कुलट उपस्थित होते.

महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशनचे अध्यक्ष एन. डी. मारणे यांच्या अध्यक्षतेखाली हे अधिवेशन होणार आहे. यावेळी खासदार निलेश लंके, खासदार भाऊसाहेब वाकचौरे, आमदार शिवाजी कर्डिले, संग्राम जगताप, विठ्ठलराव लंघे, जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, मुख्य लेखा वित्त अधिकारी शैलेश मोरे, प्राथमिक शिक्षणाधिकारी भास्कर पाटील, महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशनचे वसंतराव सबनीस, अनंतराव पाटील, म. रा. सोनवणे, वारे, मधुकर साबळे, डी. आर. पाटील अधिवेशनाच्या उद्घाटन सोहळ्यासाठी उपस्थित राहणार आहेत.

या अधिवेशनात प्रामुख्याने शहरात सेवानिवृत्त शिक्षकांचे भवन उभारण्यासाठी जागेचा प्रश्न, संघटनेला आर्थिक पाठबळ मिळण्यासाठी कलम एबी खाली संस्थेची नोंदणी करणे या प्रमुख विषयावर चर्चा केली जाणार आहे. तसेच इतर विविध प्रश्नांवर चर्चा व विचार मंथन होणार असून, मागील कार्याचा आढावा घेऊन भविष्यातील वाटचाल ठरविण्यात येणार आहे. सेवानिवृत्त शिक्षकांवरील अन्याय दूर व्हावा यासाठी चर्चा करुन शासनाकडे प्रश्न सोडवण्यासाठी पाठपुरावा केला जाणार आहे. संघटनेची स्थापना होवून ४० वर्षे झाले असून, ही संघटना राज्य संघटनेला संलग्न असल्याची माहिती ठुबे व उबाळे यांनी दिली.



अतिदुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे यासाठी अहिल्यानगरमधील श्री माहेश्वरी युवा संगठनने पेठेची वाडी (ठाकरवाडी, ता. अकोले) येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्य पुरविले.

# अतिदुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

## 'माहेश्वरी'चा मदतीचा हात, ट्रेकॅम्पच्या विशाल लाहोटींचा पुढाकार

नगर – अतिदुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे यासाठी अहिल्यानगरमधील श्री माहेश्वरी युवा संगठनने पेठेची वाडी (ठाकरवाडी, ता. अकोले) येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्य पुरविले. हे साहित्य ट्रेकॅम्पचे संस्थापक विशाल लाहोटी व मेघा लाहोटी यांच्या हस्ते वितरित करण्यात आले. यावेळी मुलांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.

पेठेची वाडी हे महाराष्ट्रातील अति दुर्गम गाव आहे. हे गाव ठाकरवाडी या नावाने सुद्धा ओळखले जाते. येथे आदिवासी ठाकर समाज राहतो. शिक्षणाप्रती या ठिकाणी अजूनही उदासीनता दिसून येते. त्यामुळे शाळेमध्ये मुलांना पाठविण्याचे प्रमाण कमी आहे. विरळ लोकवस्तीचा हा दुर्गम भाग आधुनिक जगाशी अनभिज्ञ आहे. या गावांमध्ये शाळेत फक्त २५ विद्यार्थी आहेत, पहिली ते चौथी एकाच वर्गात ही शाळा भरते. एकच शिक्षक आणि तोच मुख्याध्यापक. मुलांना शाळेमध्ये जाण्यासाठी प्रोत्साहन मिळावे म्हणून शालेय वस्तूंचे वाटप करावे, अशी विनंती सरपंच भास्कर बादड यांनी ट्रेकॅम्पचे संस्थापक विशाल लाहोटी यांच्याकडे केली होती. हा विचार नगरमधील माहेश्वरी युवा संघटन कार्यकारिणीला सांगितला. त्यास संघटनचे शाम भुतडा, अनिकेत बलदावा, अमित झंवर, दीपक जाजू, पीयूष झंवर, प्रणव बिहानी, गोविंद दरक, लड्डा परिवार, पुरूषोत्तम सोमानी, गोविंदा जाखोटिया यांनी लगेचच या प्रस्तावास मान्यता देऊन तत्परतेने स्कूल बॅग, वह्या, पेन, कंपास, चित्रकलेचे साहित्य, पॅड असा शालेय साहित्याचा संच बनवून लाहोटी यांच्याकडे दिला. त्यांनी नुकतीच प्रत्यक्ष शाळेला भेट देऊन हे साहित्य वितरित केले. या वेळी पाचनईचे सरपंच भास्कर बादड, शालेय समितीच्या अनिता सावळे, ट्रेकॅम्पचे संस्थापक विशाल लाहोटी व मेघा लाहोटी आदी उपस्थित होते.

### ...तर मुलांचे भविष्य घडेल

देश समृद्ध करावयाचा असल्यास देशातील तळागाळातील प्रत्येकाचा शैक्षणिक विकास होणे गरजेचे आहे. दुर्गम भागातील, वंचित विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी माहेश्वरी युवा संगठनप्रमाणेच इतर सामाजिक संस्था व व्यक्तींनी मदतीचा हात द्यावा. अशा कृतींमधून मुलांचे भविष्य घडेल आणि देशाचेही आहे, असे ट्रेकॅम्पचे संस्थापक विशाल लाहोटी यांनी सांगितले.

# गायत्री साधना केंद्रातर्फे २६ जानेवारीला 'पंचकुंडीय गायत्री महायज्ञ' सोहळा




नगर – येथील व्हि.आर.डी.ई. जवळील आझादनगर मधील गायत्री साधना केंद्रातर्फे २६ जानेवारीला सकाळी १०.३० ते दुपारी १ या वेळेत पंचकुंडीय गायत्री महायज्ञ सोहळ्याचे नियोजन करण्यात आले आहे, अशी माहिती काशिनाथ मोडे आणि सोन्याबापू मुदळ यांनी दिली.

ते म्हणाले, गुरूदेव आणि वंदनीय माताजी यांच्या आशिर्वादाने व सूक्ष्म संरक्षणामध्ये दिव्य अखण्ड ज्योती कलश यात्रा शताब्दी महोत्सवानिमित्त अखिल विश्व गायत्री परिवार शाखा अहिल्यानगर–बुरूडगांवच्या पुढाकाराने हा पंचकुंडीय गायत्री महायज्ञ सोहळा आयोजित करण्यात आला आहे. महायज्ञानंतर दुपारी १ ते सायंकाळी ६ दरम्यान महाप्रसाद कार्यक्रम होईल.

महायज्ञाची सांगता २७ जानेवारीला सायंकाळी ६ ते रात्री ८ दरम्यान कलश यात्रा काढून केली जाईल. या कलश यात्रेमध्ये बुरूडगावचे ग्रामस्थ आणि भजनी मंडळासह स्त्री–पुरूष भाविक सहभागी होतील.

नगर शहर आणि उपनगरातील भाविकांनी या पंचकुंडीय गायत्री महायज्ञ सोहळ्यात सहभागी होण्यासाठी भ्रमणध्वनी क्रमांक ८३२९९१०२७४,. ८१४९३६२२५८,. ९६०४३५७३३०.

# नगरमध्ये २६ जानेवारीला मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शास्त्रक्रिया शिबिराचे आयोजन

नगर – एच.व्ही. देसाई नेत्र रुग्णालय आय केअर इन्स्टिट्यूट, अलनुर आय केअर व मखदूम सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने प्रजासत्ताक दिनानिमित्त २६ जानेवारी रोजी सकाळी ९ ते ४ वाजेपर्यंत बैत–ए– अजहरी बिल्डिंग, साई फर्निचर समोर, बडी मरियम मस्जीद शेजारी मुकुंदनगर अहमदनगर येथे नेत्र तपासणी व मोतीबिंदू शास्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याचे आयोजक तनवीर चष्मावाला यांनी सांगितले.

शिबिरामध्ये मोफत कॉम्प्युटर डोळे तपासणी, मोफत मोतीबिंद शस्त्रक्रिया, अल्प दरात चष्मे वाटप, मोफत तिरळेपणा शस्त्रक्रिया तज्ञामार्फत केले जाईल, असे राजूभाई शेख यांनी सांगितले.

येताना आधार कार्ड, जुने रिपोर्ट व मोबाईल नंबर घेऊन यावे. माहितीसाठी ९७६६४४०६३२–७०२०६७८०३० ९८६०४७७८६९. याचा लाभ घेण्याचे आवाहन आबीद दुलेखान यांनी केले आहे.

# 'सखा' एकांकिकेने पटकावला 'अहिल्यानगर महाकरंडक २०२५'

## अनिल आव्हाड सर्वोत्कृष्ट अभिनेता, तर संस्कृती पवार सर्वोत्कृष्ट अभिनेत्री

नगर – 'अहिल्यानगर महाकरंडक २०२५' या एकांकिका स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ सावेडीतील माऊली सभागृहात झाला. स्पर्धा १६ ते १९ जानेवारी या कालावधीत झाली. यात 'सखा' एकांकिकेने अहिल्यानगर महाकरंडक' पटकावला. तर अनिल आव्हाड (गुडबाय किस) सर्वोत्कृष्ट अभिनेता, संस्कृती पवार (सेक्स ऑन व्हिल्स) सर्वोत्कृष्ट अभिनेत्री ठरली.

पारितोषिक समारंभाच्या वेळी आमदार संग्राम जगताप, आमदार सत्यजित तांबे, दिग्दर्शक उमेश शुक्ला, परीक्षक, अभिनेता आणि दिग्दर्शक प्रवीण तरडे, निर्माता आणि दिग्दर्शक आशिष वाघ, दिग्दर्शक आणि एडिटर मयूर हरदास, अहिल्यानगर महाकरंडक स्पर्धेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, स्पर्धेचे संयोजक स्वप्नील मुनोत, महावीर प्रतिष्ठानचे अध्यक्ष हर्षल बोरा आदींची प्रमुख उपस्थिती होती.

स्पर्धेच्या वेळी शिवकालीन पुरातन नाणी, शिवकालीन शस्त्र आणि वस्तू यांचे प्रदर्शन देखील होते. यानिमित्ताने रंगकर्मींना आणि स्पर्धेला भेट देणाऱ्यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील दुर्मिळ वस्तू पाहायला मिळाल्या. स्पर्धेत प्रथम येणाऱ्या संघास १ लाख ५१ हजार १११ रुपये रोख, अहिल्यानगर महाकरंडक आणि प्रमाणपत्र असे पारितोषिक देण्यात आले.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकाला ३५१ वर्षे पूर्ण झाल्या निमित्त या एकांकिका स्पर्धेचं यंदाचं 'उत्सव रंगभूमीचा, सोहळा शिवराज्याभिषेकाचा' हे ब्रीदवाक्य होते.

सांघिक पारितोषिके – एकांकिका प्रथम क्रमांक : सखा, द्वितीय क्रमांक : गुड बाय किस व ब्रम्हपुरा (विभागून), तृतीय क्रमांक : लेबल, उत्तेजनार्थ : स्पर्शाची गोष्ट



'सखा' एकांकिकेने अहिल्यानगर महाकरंडक २०२५ पटकावल्यानंतर होणारा जल्लोष.

सर्वोत्कृष्ट विनोदी एकांकिका : टेबल नंबर १२ को क्या चाहिये व सेक्स ऑन व्हिल्स., परीक्षक शिफारस एकांकिका : त्यात काय., वैयक्तिक पारितोषिके., दिग्दर्शन प्रथम क्रमांक : अजय पाटील (कुक्कुर), द्वितीय क्रमांक : ओम नितीन चव्हाण (सखा), तृतीय क्रमांक : संकेत पाटील व संदेश रणदिवे (चिनाब से रावी तक), उत्तेजनार्थ : वैभव काळे (ब्रॅन्डेड बाय सडक छाप), उत्तेजनार्थ : राकेश जाधव (गुडबाय किस), अभिनेता प्रथम क्रमांक : अनिल आव्हाड (गुडबाय किस), द्वितीय क्रमांक : उत्कर्ष दुधाणे (सखा), तृतीय क्रमांक : प्रवीण यादव (लेबल), उत्तेजनार्थ : पवन पोटे (देखावा), उत्तेजनार्थ : राहुल पेडणेकर (पैशाची गोष्ट)

अभिनेत्री प्रथम क्रमांक : समृद्धी पवार (सेक्स ऑन व्हिल्स), द्वितीय क्रमांक : हेमांगी आरेकर (त्यात काय), तृतीय क्रमांक : अक्षदा काळे (गुडबाय किस), उत्तेजनार्थ : समृद्धी भोसले (देव बप्पा), उत्तेजनार्थ : श्रावणी ओव्हळ (अनन्या अवज्ञा),

सह–अभिनेता प्रथम क्रमांक : संकेत शहा (टेबल नंबर १२ को क्या चाहिये) सह–अभिनेत्री : प्रथम क्रमांक : सेजल जाधव (क्रॅक इन द मिरर)

विनोदी कलाकार : प्रथम क्रमांक : ऋषिकेश वांबूरकर (टेबल नंबर १२ को क्या चाहिये), द्वितीय क्रमांक : सचिन सावंत (लेबल)

लक्षवेधी अभिनेता महेश कापरेकर (क्रॅक्स इन द मिरर)

प्रकाश योजना प्रथम क्रमांक : मयुरेश शहा (सखा), द्वितीय क्रमांक : सिद्धेश नामलसकर (जुगाड लक्ष्मी), तृतीय क्रमांक : साई शिरसेकर (गुडबाय किस)

संगीत प्रथम क्रमांक : अक्षय धांगट (जुगाड लक्ष्मी), द्वितीय क्रमांक : दुर्गेश खिरे (सखा), तृतीय क्रमांक : रोहन पटेल (गुडबाय किस)

नेपथ्य : प्रथम क्रमांक : प्रणाल व क्षितीजा (जुगाड लक्ष्मी), द्वितीय क्रमांक : देवाशीष दरवडे (चिनाब से रावी तक), तृतीय क्रमांक : सिद्धेश नामलसकर (कुक्कुर)

रंगभूषा : प्रथम क्रमांक : आचल दांडेकर (लेखिका), द्वितीय क्रमांक : गौरव बहुतुले (ब्रम्हपुरा)

वेशभूषा : प्रथम क्रमांक : गौरव बहुतुले (ब्रम्हपुरा), द्वितीय क्रमांक : कोमल पारधी (लेखिका)

लेखन : प्रथम क्रमांक : विपूल महापुरूष (टेबल नंबर १२ को क्या चाहिये), द्वितीय क्रमांक : डॉ. निलेश माने (लेबल), तृतीय क्रमांक : ओम नितीन चौहान (सखा)

परीक्षकांकडून जाहीर पारितोषिके : राकेश जाधव (गुडबाय किस), लेखिका एकांकिकेतील जाई.



# अभिषेकाची धारा

*अभिषेकाची धारा*
*विझून एक अग्निकुंड*
*धग शमली धरणीची*

*वाऱ्यासवे तरंगत आली*
*फौज काळ्या मेघांची*


*आता अभिषेकाची धारा*
*कोसळत राहणार धरेवर*

*आडोशाआडून निरखावी*
*पाऊस झेलत पापण्यांवर*

# कॅलिडोस्कोप


## करोडोची संपत्ती, तरी 'मोफत'ची सवय!

प्रत्येक व्यक्ती लहानपणापासूनच यशस्वी होण्याचे स्वप्न पाहत असते. चांगली रक्कम मिळेल, तेव्हा मोकळेपणाने खर्च करू शकेल, अशी त्याची मानसिकता असते; मात्र काही लोक वेगळे असतात. ते श्रीमंत होऊनही आपले आयुष्य कंजूषपणे घालवतात. अशाच एका व्यक्तीची गोष्ट चर्चेत आली. ती आपल्या अनोख्या जीवनशैलीमुळे लोकांमध्ये चर्चेत आहे. त्यांचे नाव आहे, ७५ वर्षीय जपानी दिग्गज हिरोतो किरितानी. त्यांच्याकडे करोडोंची संपत्ती आहे; परंतु असे असूनही ते दररोज कूपन आणि मोफत ऑफरचा लाभ घेतात आणि त्यांचे जीवन जगतात. किरीतानी हा जपानी बुद्धिबळसारखा खेळ असलेल्या शोगीचा व्यावसायिक खेळाडू होता. शेअर बाजारातील एका सिक्युरिटीज फर्ममध्ये शिक्षक म्हणून त्यांनी आपल्या करिअरची सुरुवात केली. येथून त्यांनी व्यापाराचे कौशल्य शिकले आणि २०२४ पर्यंत त्याची संपत्ती ६० कोटी येन (३१.५ कोटी रुपये) पर्यंत वाढली. एवढा पैसा असूनही कोणी कंजूष कसा असू शकतो, असा प्रश्न कुणालाही पडेल. २००८ मध्ये शेअर बाजारातील घसरणीनंतर त्याला २० कोटी येनचे नुकसान सहन करावे लागले होते. त्यानंतर किरीतानी ठरवले, की आता एक पैसाही वाया जाणार नाही. यासाठी त्यांनी १,००० हून अधिक कंपन्यांचे शेअर्स खरेदी केले आणि त्यांची कूपन आणि शेअरहोल्डरचे भत्ते वापरण्यास सुरुवात केली. काही जपानी कंपन्या त्यांच्या भागधारकांना सवलत कूपन, मोफत उत्पादन नमुने, मोफत तिकिटे, भेटवस्तू, बोनस आणि कंपनीच्या कार्यक्रमांना उपस्थित राहण्याची संधी देतात. यामुळे कंपनीच्या गुंतवणूकदारांची निष्ठा राखण्यात मदत होते. याचा फायदा घेत किरीतानी सकाळी लवकर आपली सायकल काढतात. मोफत जेवण गोळा करायला सुरुवात करतात. ते जिममध्ये मोफत व्यायाम करतात आणि मोफत मूव्ही तिकिटांद्वारे दरवर्षी १४० चित्रपटही पाहतात. किरीतानी सांगतात, की आता माझ्या आयुष्याचा योग्य उद्देश कूपन वापरणे हा झाला आहे.




## गूढरम्य 'मिरनी माईन'

सायबेरियाच्या पूर्व भागात 'मिरनी माईन' ही जगातली सर्वात मोठी हिऱ्याची खाण आहे. या खाणीतल्या हिऱ्यांची संख्या प्रचंड आहे. यातून खूप मोठ्या प्रमाणावर हिरे काढले जातात. ही खाण १७२२ फूट खोल आणि ३९०० फूट रुंद आहे. 'मिरनी माईन' हा जगातला दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा मानवनिर्मित खड्डा आहे. रशियन भूगर्भशास्त्रज्ञांनी १३ जून १९५५ या दिवशी या खाणीचा शोध लावला. या शोधासाठी युवी खबरदीन या शास्त्रज्ञाला १९५७ मध्ये लेनिन पुरस्काराने गौरवण्यात आलं. या खाणीच्या विकासकामाला १९५७ पासून सुरूवात झाली. वर्षातला बराच काळ या भागातलं वातावरण खराब असतं. हिवाळ्यात तर इथलं तापमान खूप खाली घसरतं. गाड्यांमधलं इंधनही या काळात गोठलेलं असतं. या खाणीच्या खोदकामात जेट इंजिन आणि डायनामाइट्सचा वापर केला होता. या खाणीच्या शोधानंतर हिरे उत्पादनात रशिया तिसऱ्या स्थानी आला. ही खाण खूप मोठी आणि खोल आहे. त्यामुळे यावरून जाणारी हेलिकॉप्टर्स हवेच्या दबावामुळे खड्डयात सामावली आहेत. अशा काही घटनांनंतर या भागावरून हेलिकॉप्टरच्या उड्डाणाला बंदी घालण्यात आली. २०११ नंतर या खाण पूर्णपणे बंद करण्यात आली आहे.



## अंधश्रद्धेतून जीभ कापून शंकराला अर्पण!

श्रद्धा आणि अंधश्रद्धा यात फरक आहे. देशात अनेक मृत्यू केवळ अंधश्रद्धेमुळे होतात. असेच एक प्रकरण छत्तीसगडमधून समोर आले. तिथे अकरावीत शिकणाऱ्या एका विद्यार्थिनीने तिची जीभ कापून ती भगवान शिवाला अर्पण केली. ही बाब घरातील सदस्यांना आणि परिसरातील लोकांना समजताच सर्वत्र तणावाचे वातावरण निर्माण झाले. छत्तीसगडमधील सक्ती जिल्ह्यातील देवरघाचा गावातील आचरिपाली येथे भगवान शंकराची पूजा करताना १६ वर्षाच्या मुलीने आपल्या जिभ कापून ती शंकराला वाहिली. यानंतर विद्यार्थिनीने स्वत:ला मंदिरात कैद केले आणि ती देवपूजेत मग्न झाली. ही बाब लोकांना समजताच पोलिसांना कळवण्यात आले; मात्र गावकऱ्यांनी पोलिसांना



मंदिरात जाण्यापासून रोखले. मुलगी मंदिरात भक्तीमध्ये मग्न असल्याचे कुटुंबीय आणि ग्रामस्थांचे म्हणणे होते. त्यानंतर वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी आले तेव्हा ग्रामस्थांनी मंदिराला चारही बाजूंनी घेराव घातला आणि मुलीला रुग्णालयात नेण्यास नकार दिला.

अंधश्रद्धेपोटी एखाद्याने असे पाऊल उचलण्याची ही पहिलीच वेळ नाही. याआधी वाराणसीच्या गायघाट कोतवाली पोलिस ठाण्यांतर्गत एक धक्कादायक घटना घडली. देवी कालीवर अपार श्रद्धा असलेल्या पुजाऱ्याने दर्शन न मिळाल्याने स्वत:ची मान कापली. यानंतर पुजाऱ्याला रक्तस्त्राव होत असल्याचे पाहून कुटुंबीयांनी त्याला तातडीने ट्रॉमा सेंटरमध्ये नेले, तेथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

## मॅचसाठी १४ हजार किलोमीटरची वारी!






फुटबॉल हा एक असा खेळ आहे ज्याचे जगभरात लाखो चाहते आहेत. त्याच वेळी, इंग्लिश प्रीमियर लीग (ईपीएल) बद्दल चाहत्यांच्या उत्कटतेला आणि समर्पणाला मर्यादा नाही. अलीकडेच, मँचेस्टर युनायटेडचा उत्कट चाहता असलेल्या ओचिरवानी बॅटबोल्डने त्याच्या आवडत्या क्लबचा सामना पाहण्यासाठी मंगोलिया ते ब्रिटन असा १४ हजार किलोमीटरचा सायकलवरून प्रवास करून हे सिद्ध केले. तथापि, २६ वर्षीय बॅटबोल्डच्या सायकलिंग प्रवासामागील प्रेरक शक्ती केवळ फुटबॉल सामन्याची आवड नव्हती, तर ते एक वैयक्तिक मिशनदेखील होते.

त्याने त्याच्या लहानपणी त्याच्या आईला वचन दिले होते, की तो तिला एक दिवस मँचेस्टर युनायटेड सामना पाहण्यासाठी घेऊन जाईल. बॅटबोल्डने ५ मे २०२३ रोजी मंगोलिया येथून सायकलिंगचा प्रवास सुरू केला आणि उझबेकिस्तान, तुर्कमेनिस्तान, इराण, तुर्की, बल्गेरिया, उत्तर मॅसेडोनिया, कोसोवो, सर्बिया, हंगेरी, ऑस्ट्रिया, जर्मनी आणि फ्रान्स मार्गे मँचेस्टर, ब्रिटन गाठले. त्याने एक्सवर फुटबॉल सामन्यादरम्यान त्याच्या आईसोबत काढलेला एक फोटो शेअर केला आणि लिहिले, मी ओल्ड ट्रॅफर्ड येथे माझा पहिला सामना पाहण्यासाठी मंगोलिया ते मँचेस्टरपर्यंत सायकल चालवली. तो पुढे म्हणाला, की मँचेस्टरवर माझे किती प्रेम आहे याचा हा पुरावा आहे. बॅटबोल्डने २०१० पासून क्लबला पाठिंबा देण्यास सुरुवात केली. या जबरा चाहत्याने क्लबला पत्र लिहिले, मँचेस्टर हा माझा आवडता संघ आहे आणि मी घरून (मंगोलिया) सायकलने मँचेस्टरला निघालो आहे.

## वरमाला घालताना प्रेयसीची वराला लाथ!

असं म्हणतात की पहिलं प्रेम नक्कीच परत येतं, मग ते लग्नपत्रिका द्यायला येतं किंवा लग्न बिघडवायला येतं; पण ते नक्कीच येतं. एका लग्नसमारंभात एक वर आपल्या वधूला हार घालत असताना त्याची प्रेयसी मागून येते आणि त्याला लाथ मारून पडते आणि बघता बघता मारामारी सुरू होते.

लग्नाच्या थाटामाटात वराची मैत्रीण स्टेजवर आल्यावर एकच गोंधळ उडाला. या वेळी वर आपल्या वधूला हार घालत होता; मात्र प्रेयसीने पाठीमागून येऊन वराला लाथ मारली. जणू ती म्हणत होती, की प्रेमात फसवणूक करून आपण दुसऱ्याचे होऊ शकत नाही. एका लग्न समारंभात झालेल्या गोंधळामुळे सर्व पाहुणे आश्चर्यचकित झाले. वराच्या मैत्रिणीने अचानक स्टेजवर चढून सर्वांसमोर वराला लाथ मारली. मंचावर वर वधूला हार घालण्यासाठी जात असताना ही घटना घडली. गर्दीतून एक महिला स्टेजवर आली आणि तिने काहीही न बोलता वराला लाथ मारली. ही घटना तिथे उपस्थित सर्वांसाठी धक्कादायक होती. एका महिलेने वराला उचलले आणि त्यानंतर वाद सुरू झाला. वर त्याच्या कथित प्रेयसीवर वर्चस्व गाजवताना दिसला, तर कथित प्रेयसीने त्याला डोळा मारून धमकी दिली.




## अंतराळात तयार झाली बिस्कीटं!



अंतराळातलं आकर्षण अद्यापही कमी झालेलं नाही. अंतराळात यानं पाठवली जात असली, अंतराळवीरांकडून बरीच माहिती मिळत असली तरी इथे दडलेली अनेक गुपितं अजूनही उलगडलेली नाहीत. म्हणूनच अंतराळात मायक्रोवेव्ह ओव्हन पाठवण्यात आला. अंतराळ स्थानकात पाठवल्या जाणाऱ्या या ओव्हनचं कार्य यावेळी तपासलं गेलं. अंतराळवीरांनी या ओव्हनमध्ये बिस्किट बनवली. अंतराळातल्या शून्य गुरूत्वाकर्षणात बिस्किटं बेक होण्याची प्रक्रिया कशी पार पडते, याचा अभ्यास या निमित्ताने करण्यात येणार आला. अंतराळ्यानात कृत्रिम पद्धतीने पृथ्वीसारखं वातावरण तयार केलं जातं. त्यामुळे मायक्रोग्रॅव्हिटीमध्ये बिस्किट तयार होण्याची प्रक्रिया नेमकी कशी होते, हे जाणून घेणं उत्सुकतेचं ठरलं. त्यातच अंतराळातल्या या बिस्किटांच्या चवीबाबतही कुतुहल निर्माण झालं. झीरो जी किचन आणि डबल ट्री बॉय हिल्टन या कंपन्यांनी मिळून हा ओव्हन तयार केला. अंतराळात बनवलेल्या बिस्किटांमुळे शास्त्रज्ञांना बरीच माहिती मिळाली.


## शहाळ्यावर अवतरल्या ऐतिहासिक वास्तू

इंदूरमधल्या गजेंद्र शर्मा नावाच्या तरुणाने शहाळ्यावर अनोख्या कलाकृती साकारल्या आहेत. त्याने जगभरातल्या महत्त्वाच्या ऐतिहासिक वास्तूंनी ही शहाळी सजवली आहेत. गजेंद्र बीएससीच्या पहिल्या शेवटच्या वर्षाला असून त्याच्या या कामगिरीची दखल विविध रेकॉर्ड बुक्सनी घेतली आहे. फक्त दोन दिवसात त्याने शहाळ्याच्या कवचावर ५१ कलाकृती साकारल्या. यासाठी त्याला फक्त ७२ रुपये खर्च आला. 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स' आणि 'लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्स'मध्ये त्याच्या या विक्रमाची नोंद करण्यात आली आहे. गजेंद्रने सर्वप्रथम फेब्रुवारीमध्ये शहाळ्याच्या कवचावर लाल किल्ल्याचं चित्र काढलं. त्यानंतर तो थांबला नाही. कुतुबमिनार, हवा महल, चीनची भिंत, ताज महालासह युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीतल्या ५१ वास्तू त्याने रेखाटल्या. त्याच्या या अनोख्या कलाकृतींचं प्रदर्शन होळकर विज्ञान महाविद्यायात भरवण्यात आलं होतं. यावेळी अनेकांनी गजेंद्रचं तोंड भरून कौतुक केलं. 'इंडिया बुक्स ऑफ रेकॉर्ड्स'मध्ये 'मॅक्झिमम वर्ल्ड हेरिटेज स्केच्ड ऑन वेस्ट कोकोनट शेल' या शीर्षकाअंतर्गत त्याची ही कामगिरी नोंदवण्यात आली आहे.



## पाण्याने तळ गाठला आणि...


अचानक लागलेला एखादा शोध आपल्याला थक्क करून सोडतो. अशा शोधांमधून प्राचीन काळातली काही गुपितं उघड होऊ शकतात. असाच एक शोध इराकमधल्या कुर्दिस्तान भागात लागला आहे. इथल्या एका जलाशयातल्या पाण्याने तळ गाठला आणि पाण्याच्या पोटात सामावलेली एक इमारत लोकांना दिसली. ही इमारत बघून सर्वांचेच डोळे पांढरे झाले. ही इमारत जवळपास ३४०० वर्षांपूर्वीची असल्याचं बोललं जात आहे. टिगरिस नदीवर बांधलेल्या मोसूल धरणातलं पाणी कमी झाल्यामुळे ही इमारत दिसू लागली. या शोधाचं श्रेय कुर्दीश-जर्मन संशोधकांना द्यायला हवं. पुरातत्त्व विभागाला २०१० मध्ये या परिसराची माहिती मिळाली होती. मात्र त्यावेळी खोदकाम करता आलं नाही. या जलाशयात ३४०० वर्षं जुन्या महालाचे अवशेष सापडले आहेत. प्राचीन काळात इराकमध्ये मित्तानी साम्राज्य होतं. हा महाल याच काळातला असल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. या महालाची रचना अनोखी असल्याचं शास्त्रज्ञ सांगतात. खोदकामादरम्यान महालात लाल आणि निळ्या रंगाची काही चित्रंही सापडली आहेत. हा महाल ६५ फूट उंच असल्याचा तर्क लढवला जात आहे. महालात काही दगडही सापडले असून त्यावर काही



मजकूरही आढळला आहे. या दगडांना क्युनिफॉर्म टॅबलेट असं म्हणतात. क्युनिफॉर्म ही प्राचीन लेखनशैली असल्याचं शास्त्रज्ञ सांगतात. मजकूर जाणून घेण्यासाठी हे दगड जर्मनीला पाठवण्यात आले आहेत. मित्तानी साम्राज्याबद्दल फारसं संशोधन झालेलं नाही. मात्र या महालामुळे काही गोष्टी उजेडात येण्याची शक्यता आहे.

## इथे होत नाही चढाई

'माउंट एव्हरेस्ट' हे जगातलं सर्वात उंच पर्वतशिखर आहे. आजवर अनेकांनी हे शिखर सर करण्याची कामगिरी करून दाखवली आहे. काही दिवसांपूर्वी 'माउंट एव्हरेस्ट'वर गिर्यारोहकांची खूप गर्दी झाली होती. त्यामुळे जगातल्या या सर्वात उंच शिखरावर 'ट्रॅफिक जाम'सारखी परिस्थिती उद्भवली होती. गिर्यारोहक जगातल्या विविध शिखरांवर चढाई करतात. मात्र एव्हरेस्टपेक्षा कमी उंचीच्या एका पर्वतावर अजूनही कोणी चढलेलं नाही. 'गंगखार पुनसुम' असं या पर्वताचं नाव आहे. भूतान आणि चीन या दोन देशांच्या मध्यभागी वसलेल्या या पर्वताची उंची २४,८४० फूट आहे तर माउंट एव्हरेस्ट २९,०२९ फूट उंच आहे. या पर्वतमाथ्यावर चढण्याचे काही प्रयत्न झाले. १९९४ मध्ये भूतानने चीनच्या मदतीने गिर्यारोहकांचा हा प्रयत्न हाणून पाडला. याचं कारण म्हणजे भूतानचे लोक पर्वताला देवासमान मानतात. त्यामुळे 'गंगखार पुनसुम' पर्वत त्यांच्यासाठी पवित्र स्थळ आहे. त्यामुळे या पर्वतावर चढाई करायला बंदी घालण्यात आली. भूतान सरकारने १९९४ मध्ये एक कायदा केला. त्यानुसार भूतानमध्ये २० हजार फुटांपेक्षा अधिक उंचीच्या पर्वतांवर चढायला बंदी आहे.



# नगर शहरात २४ जानेवारीला रक्तदान शिबिराचे आयोजन



नगर – अहिल्यानगर जिल्हा व शहर केमिस्ट असोसिएशनच्यावतीने २४ जानेवारी रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. जुना बाजार येथील संजय एजन्सी येथे होणाऱ्या रक्तदान शिबिरात सर्व केमिस्ट बांधव, केमिस्ट कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार, दुकानातील कर्मचारी व औषध विक्री प्रतिनिधी सर्व फार्मसी महाविद्यालयांना सहभागी होण्याचे आवाहन केमिस्ट असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष दत्ता गाडळकर व ए.आय.ओ.सी.डी.ए. निमंत्रित सदस्य अजित पारख यांनी केले आहे.

महाराष्ट्र राज्य केमिस्ट असोसिएशनच्या माध्यमातून जगन्नाथ (आप्पासाहेब) शिंदे यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त संपूर्ण राज्यात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवारी सकाळी ८ ते सायंकाळी ६ वाजे पर्यंत संघटनेच्या सर्व झोनमधील सर्व जिल्ह्यांमध्ये शहरासह तालुकास्तरावर देखील रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. एकाच दिवशी ७५ हजार पेक्षा जास्त रक्तदात्यांचे रक्त संकलन करण्याचे उद्दीष्ट समोर ठेवण्यात आले आहे.

या शिबिराने राज्यातील रक्ताचा तुटवडा भरून निघण्यास मदत होणार आहे. केमिस्ट असोसिएशन सेवाभावाने विविध उपक्रम राबवीत आहे. त्याच्याच एक भाग म्हणून या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व तालुकास्तरावर रक्तदान शिबिर होणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

शिबिर यशस्वी करण्यासाठी आबासाहेब बेद्रे, प्रशांत उबाळे, भरत सुपेकर, मनोज खेडकर, मनिषा आठरे, सोमानी मनिष व सर्व संचालक मंडळ यांनी नियोजन केले आहे.

# शहरातील कचरा वेचक कामगारांची ऑनलाईन नोंदणी सुरु



सिध्दार्थनगर येथील कचरा वेचक कामगारांच्या नोंदणी अभियानाचे शुभारंभ माजी नगरसेवक अनिल शेकटकर यांच्या हस्ते झाले.

नगर – केंद्र व राज्य सरकारकडे महाराष्ट्रातील कचरा वेचक कामगारांचा अधिकृत आकडा नसल्याने ऑल इंडिया कचरा वेचक संघटनेच्या माध्यमातून महाराष्ट्रात ऑनलाईन कचरा वेचकांची नोंदणी सुरु करण्यात आली आहे. शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ कचरा वेचकांना मिळण्याच्या उद्देशाने ही नोंदणी सुरु असून, या पार्श्वभूमीवर कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायतच्या माध्यमातून शहरातील कचरा वेचकांची नोंदणी सुरु करण्यात आली आहे.


सिध्दार्थनगर येथील कचरा वेचक कामगारांच्या नोंदणी अभियानाचे शुभारंभ माजी नगरसेवक अनिल शेकटकर यांच्या हस्ते झाले. श्रमिक कष्टकरीचे नेते तथा माजी नगरसेवक भाऊसाहेब उडाणशिवे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी कामगार नेते बाळासाहेब वडागळे, ऑल इंडिया कचरा वेचक संघटनेचे प्रतिनिधी निखिल, कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायतचे जिल्हा समन्वयक विकास उडाणशिवे, पोपट पाथरे आदींसह सिध्दार्थनगर भागातील कचरा वेचक महिला व बांधव उपस्थित होते.

अनिल शेकटकर म्हणाले की, कचरा वेचकांना त्यांचा हक्क मिळाला पाहिजे. उपेक्षित घटकांना कल्याणकारी योजनांचा लाभ मिळण्यासाठी सुरु असलेली नोंदणी त्यांच्या कल्याणासाठी पडलेले पाऊल आहे. विविध कल्याणकारी योजना तयार असून, लाभार्थींना त्या योजना पदरात पाडून घेता आले पाहिजे. यासाठी सुरु असलेले संघटनेचे कार्य दिशादर्शक आहे. कष्टकऱ्यांच्या संघर्षासाठी नेहमीच पाठबळ राहणार असल्याचे त्यांनी आश्वासन दिले.

भाऊसाहेब उडाणशिवे म्हणाले, कष्ट करून कचरा वेचक उदरनिर्वाह करतात. कुटुंबाचा भार पेळतान एखादे संकट आल्यास आवश्यक कागदपत्र नसल्याने शासनाच्या योजनांचा लाभ त्यांना मिळत नाही. कचरा वेचक कामगारांची अधिकृतपणे नोंदणी झाल्यास शासनाला त्यांच्याकडे विशेष योजना राबविता येणार आहे. या कामगारांचे प्रश्न सोडवण्याचे काम सदर संस्था सेवाभावाने करत आहे. दे रे हरी पलंगावरी.... ही संकल्पना बदलावी लागणार आहे. उपेक्षित राहू नये यासाठी कामगारांनी जागरूक राहून शासनाकडे पाठपुरावा करावा लागणार असल्याचे त्यांनी सांगितले.

बाळासाहेब वडागळे म्हणाले, हमाल कष्टकरी वर्गासाठी मागील ४० वर्षापासून कार्य करत आहे. कचरा वेचकांच्या हक्कासाठी देखील पाठबळ देण्याचे काम करणार आहे. वंचित, शोषितांच्या संघर्षात सदैव पुढाकार राहणार असल्याचे आश्वासन त्यांनी दिले. या नोंदणी अभियानाद्वारे सिध्दार्थनगर परिसरातील कचरा वेचकांची नोंदणी करण्यात आली. उपस्थितांचे स्वागत करुन विकास उडाणशिवे यांनी आभार मानले.

# अर्धवट पुलाचे काम पूर्ण न केल्यास १० फेब्रुवारी रोजी नदीत 'जलसमाधी'



अर्धवट पुलाचे काम पूर्ण करण्याच्या मागणीचे निवेदन प्रशानाला देताना स्वतंत्र भारत पक्षाचे पदाधिकारी.

नगर – गोदावरी नदीवरील महांकाळ वाडगाव, ता.श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर ते नागमठान, ता. वैजापूर, जिल्हा संभाजीनगर यांना जोडणाऱ्या अर्धवट अवस्थेतील पुलाचे काम तत्काळ सुरू न केल्यास १० फेब्रुवारी रोजी त्याच अर्धवट पुलावरून स्वतंत्र भारत पक्ष, शेतकरी संघटना, शेतकरी संघटना महिला आघाडीकडून गोदावरी नदीत जलसमाधी आंदोलन करण्यात येणार

गोदावरी नदीवरील अहिल्यानगर व संभाजीनगर या दोन जिल्ह्यांना जोडणारा पुलाचे काम गेल्या ४ वर्षपासून सरकारी दफ्तर दिरंगाईमुळे रखडले आहे. शासनाने या पुलासाठी खर्च केलेले २० कोटी रुपये पाण्यात गेले आहेत. या पुलास जोडणारे दोन्ही जिल्हाचे बाजूचे भराव व जोडरस्ते न केल्याने हा कोट्यवधी रुपये खर्चून बांधलेल्या पुलाचा असून अडचण नसून खोळंबा झाला आहे. या पुलाचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग संभाजीनगर मार्फत केले जाते आहे. त्यांनी महांकाळ वडगांव, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर बाजूने जोडरस्ता करणेकामी भूमी अभिलेख विभाग श्रीरामपूर यांचेकडून रस्त्याची मोजणी व त्याच्या अंतिम खुणा करून दिल्या आहेत. त्यावर प्रांताधिकारी श्रीरामपूर यांनी सदर रस्त्यात शेतकऱ्यांच्या जाणाऱ्या जमिनींचे मूल्यमापन अहवाल तयार करून तो सार्वजनिक बांधकाम विभाग संभाजीनगर यांना सादर करावयाचा आहे परंतु प्रांताधिकारी श्रीरामपूर काही तांत्रिक कारण सांगून शेतकऱ्यांच्या जमिनीचा मूल्यमापन अहवाल सार्वजनिक बांधकाम विभाग संभाजीनगर यांना देत नाहीत. त्यांनी मूल्यमापन अहवाल न दिल्याने पुढची रस्त्यासाठी जमीन अधिग्रहण करण्याची प्रक्रिया ठप्प होऊन रस्त्याचे भराव व जोडरस्त्याचे काम सरकारी दफ्तर दिरंगाई आणि दोन्ही जिल्ह्यातील संबधित सार्वजनिक व महसूल विभाग यांचे मध्ये समन्वय नसल्याने रखडले आहे.

या पुलाचे काम तत्काळ सुरू करण्यासाठी स्वतंत्र भारत पक्ष, शेतकरी संघटना, शेतकरी संघटना महिला आघाडी अहिल्यानगर यांचे नेतृत्वात १० फेब्रुवारी रोजी गोदावरी नदीवरील अर्धवट पुलावरून जलसमाधी आंदोलन करण्यात येणार आहे असे निवेदन जिल्हाधिकारी राजेन्द्र पाटील यांना देण्यात आले. जिल्हाधिकारी यांनी दोन्ही जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग आणि महसूल विभाग यांचेमध्ये योग्य तो समन्वय साधून तातडीने या अर्धवट पुलाचे काम सुरू करावे अशी विनंती केली आहे. अन्यथा १० फेब्रुवारी रोजी त्याच अर्धवट अवस्थेतील पुलावरून गोदावरी नदीत जलसमाधी घेण्याचे आंदोलन करण्याचा इशारा स्वतंत्र भारत पक्ष शेतकरी संघटना शेतकरी संघटना महिला आघाडीकडून देण्यात आला आहे.

सदर निवेदनावर जिल्हाध्यक्ष नीलेश शेडगे, उपाध्यक्ष नवनाथ दिघे, महिला आघाडीच्या अध्यक्षा सौ. सुनितताई वानखेडे, शीतल पोकळे, मंदा गमे, आशा महांकाळे, कोमल वानखेडे, शिला वानखेडे, तालुकाध्यक्ष प्रकाश जाधव, मधुकर काकड, नामदेव घोगरे, श्रीराम त्रिवेदी, विष्णू भनगडे, भानुदास चोरमल, सुभाष घोगरे, गोकुळ खुरुद, शांताराम महांकाळे, बाळासाहेब घोगरे, राजेंद्र आढाव, युवा आघाडीचे मयूर भनगडे आदी उपस्थित होते.

# विश्व हिंदू परिषदेच्या जिल्हा उपाध्यक्षपदी वसंत सिंग



नगर – नगर जिल्हा मजदूर सेनेचे सचिव व भाजप साऊथ इंडियन आघाडीचे जिल्हाध्यक्ष वसंत तच्चापुल्ली उर्फ वसंत सिंग यांची विश्व हिंदू परिषदेच्या अहिल्यानगर जिल्हा उपाध्यक्ष निवड करण्यात आली. तशी घोषणा राहुरी येथील केंद्रीय विभाग बैठकीत केंद्रीय प्रांत ट्रस्टी प्रभाकर शिंदे पाटील यांनी केली. यावेळी प्रांत सहमंत्री ॲड. सतिश गोरडे व प्रांत सहमंत्री नितीन वाटकरसह जिल्ह्यातील सर्व ठिकाणचे पदाधिकारी उपस्थित होते.

विश्व हिंदू परिषदेची उत्तर व दक्षिण विभाग बैठक नुकतीच राहुरीत झाली. यामध्ये श्रीरामपूर व अहिल्यानगर जिल्हा पदाधिकारी, इतर प्रखंड पदाधिकारी, जिल्हा समिती, पूर्ण प्रखंडचे पदाधिकारी उपस्थित होते

भारतमाता पूजन कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. यावेळी विविध सत्रे झाली. यात स्थाणुमालयन, संयुक्त केंद्रीय महामंत्री यांनी प्रश्नोत्तरे व माहिती घेतली व प्रखंड स्तर व जिल्हा स्तर व नंतर माहिती घेवून मार्गदर्शन केले. प्रभाकर शिंदे यांनी गो आधारित शेती या विषयावर मार्गदर्शन केले आणि नितीन वाटकर यांची प्रांत सहमंत्रीपदी नियुक्ती घोषणा व मनोगत व्यक्त केले.

बैठकीचा समारोप स्थानुमलायन यांनी संयुक्त केंद्रीय मंत्री यांनी समारोप विहिंप कामांची आवश्यकता व कार्य यांची माहिती दिली तसेच वेगवेगळी उदाहरणे देवून पटवून दिली.

यावेळी विभाग मंत्री सुनिल खिस्ती, जिल्हा मंत्री अनिल जोशी, शरद नगरकर, शिवाजी साळुंखे, ॲड. सतिश गोरडे, विशाल वाघचौरे व नितीन वाटकर आदी उपस्थित होते.





कारागृहातील १७५ कैद्यांची महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत आरोग्य तपासणी करण्यात आली.

# कारागृहातील १७५ कैद्यांची मनपाकडून आरोग्य तपासणी

## राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत १०० दिवसीय प्रधानमंत्री क्षयरोगमुक्त भारत अभियानअंतर्गत उपक्रम

नगर – अहिल्यानगर महानगरपालिका राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत १०० दिवसीय प्रधानमंत्री क्षयरोगमुक्त भारत अभियानात अहिल्यानगर जिल्हा कारागृहातील १७५ कैद्यांची आरोग्य तपासणी महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आली. मंगळवारी या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. क्षय रोगमुक्त अहिल्यानगर करण्यासाठी शासनाच्या अभियानाच्या माध्यमातून हा उपक्रम राबवण्यात आल्याचे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी सांगितले.

मंगळवारी सकाळी शहरातील सबजेल कारागृह येथे आयुक्त यशवंत डांगे व कारागृह अधीक्षक संतोष कवार यांच्या हस्ते या आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी उपायुक्त विजयकुमार मुंडे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. सतिष राजुरकर, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. अविनाश आहेर, शहर क्षयरोग अधिकारी डॉ. साहिल शेख, कारागृहाच्या वैद्यकीय अधिकारी श्रीमती सुजाता सानप आदी उपस्थित होते.

शिबिरात कैद्यांचे स्क्रिनिंग, छातीचा एक्स–रे तपासणी (हॅंड हेल्ड इरे स्मार्ट एक्स–रे मशिनद्वारे), स्पुटम तपासणी करून त्यांच्यावर उपचार करण्यात आले. डॉ. साहिल शेख, डॉ. सुजाता सानप, मनपाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. वृषाली आरु, डॉ. विनय शेळके यांनी तपासणी केली. १७५ कैद्यांची शिबिरात तपासणी करण्यात आली. डॉ. साहिल शेख यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.

कार्यक्रम विषयक माहिती डॉ. अविनाश आहेर यांनी दिली. अधीक्षक संतोष कवार, आयुक्त यशवंत डांगे यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. सुजाता सानप यांनी आभार मानले.

# भूमिहीन कुटुंबीयांना राहण्यासाठी महाराष्ट्र शासनाने जागा द्यावी अन्यथा सात दिवसानंतर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण



भूमिहीन कुटुंबीयांना राहण्यासाठी महाराष्ट्र शासनाचे जागा द्यावी, या मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

नगर – महाराष्ट्र शासनाच्या जागेतून भूमिहीन कुटुंबीयांना ग्रामपंचात हद्दीमध्ये कोठेतरी राहण्यासाठी जागा मिळवून द्यावी. जागा नावावर नसल्याने आदिवासी भिल्ल समाजाच्या कुटुंबीयांना घरकुलाचा लाभ देखील घेता येत नसल्याने ग्रामपंचायत हद्दीतील जागा राहण्यासाठी नावावर करून देण्याच्या मागणीसाठी एकलव्य संघटनेचे महाराष्ट्र संघटक मोहन गोलवाड, महाराष्ट्र संघटिका वैजयंता गोलवाड व नाशिक सभापती शिवाजी ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. यावेळी शिवराम माळी, अण्णासाहेब पवार, बबनराव गडाख, राजू आहेर, जगन्नाथ गडाख आदीसह भूमिहीन कुटुंबीय उपस्थित होते.

पुढे निवेदनात म्हटले आहे की, शहर टाकळी ता.शेवगाव येथील ग्रामपंचायत हद्दीमध्ये आदिवासी भिल्ल समाजाचे अनेक कुटुंबीय असून हे ज्या ठिकाणी राहतात त्या ठिकाणची जागा नावावर नसून ती महाराष्ट्र शासनाची आहे त्यामुळे या कुटुंबीयांना घरकुलाचा देखील लाभत भेटत नाही व ज्या ठिकाणी राहतात त्या ठिकाणचे हे कुटुंबीय लाईट बिल व पाणीपट्टी भरत आहे. हे कुटुंबीय अनेक वर्षापासून राहत असून जमीन कसुन खात आहे. संपूर्ण जमीन नावावर न करता राहत्या घराची जागा नावावर करून देण्याची मागणी करण्यात आली असून लवकरात लवकर राहत्या घराची जागा नावावर करण्यात यावी व घरकुलाचा लाभ देण्यात यावा अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. अन्यथा ७ दिवसानंतर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाचा इशारा देण्यात आला आहे.

# विभागीय मराठी नाट्य संमेलनानिमित्त २४ जानेवारी रोजी रंगणार बालमहोत्सव




नगर – अखिल भारतीय नाट्य परिषदेने १०० वे अखिल भारतीय मराठी विभागीय नाट्य संमेलनाच्या यजमानपदामुळे नगरच्या रंगकर्मी तसेच नाट्य रसिकांमध्ये उत्साहाचे वातावरण तयार झाले आहे. २६ व २७ जानेवारी रोजी संमेलनाध्यक्ष डॉ.जब्बार पटेल यांच्या उपस्थितीत होणाऱ्या या नाट्य संमेलनात भरगच्च कार्यक्रमांची मेजवानी रसिकांना मिळणार आहे. संमेलनानिमित्त २४ जानेवारी रोजी बालमहोत्सव आयोजित करण्यात आला आहे. सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत सावेडी रोडवरील माऊली सभागृहात बालमहोत्सव होणार आहे, अशी माहिती विभागीय संमेलन प्रमुख क्षितीज झावरे व नाट्य परिषदेच्या उपनगर शाखेचे अध्यक्ष प्रा. प्रसाद बेडेकर यांनी दिली.

तब्बल २२ वर्षानंतर नगर शहरात अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन होत आहे. प्रा.मधुकर तोरडमल, सदाशिव अमरापूरकर यांच्यासारखे दिग्गज कलाकार सिने नाट्यसृष्टीला देणाऱ्या नगर शहरात या संमेलनामुळे उत्साहाचे वातावरण आहे. संमेलनाचे स्वागताध्यक्ष डॉ.बापूसाहेब कांडेकर व निमंत्रक आ. संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली नाट्य परिषदेची टिम संमेलनाची जय्यत तयारी करीत आहे. शतकमहोत्सवी नाट्य संमेलन अतिशय थाटामाटात व रसिकांना संस्मरणीय सांस्कृतिक मेजवानी देणारे ठरेल असे विविध कार्यक्रम नियोजित आहेत.

२४ जानेवारीला माऊली सभागृहात सकाळी १० वाजता कोकमठाण येथील आत्मा मलिक इंग्लिश मिडियम गुरुकुल निर्मित 'डस्टर' ही एकांकिका सादर होईल. सकाळी ११ ते १२ यावेळेत किलबिल बालविकास संस्था निर्मित 'हीच खरी सुरुवात' ही एकांकिका सादर होईल. दुपारी १२ ते १ दरम्यान होप फौंडेशन निर्मित 'जीना इसी का नाम है !' ही एकांकिका रसिकांना पाहता येणार आहे. दुपारी २ वाजता नगरमधील रामकृष्ण एज्युकेशन फौंडेशन निर्मित 'कृष्णलीला' हा भव्यदिव्य कार्यक्रम होणार आहे. स्थानिक कलाकारांची निर्मिती असलेला हा कार्यक्रम भगवान श्रीकृष्णांचे जीवन चरित्र उलगडून दाखवणारा आहे. सर्व एकांकिका तसेच कार्यक्रमांसाठी प्रवेश विनामूल्य आहे. नगरकरांनी या कार्यक्रमांचा आवर्जून लाभ घेत रंगकर्मींना प्रोत्साहित करावे असे आवाहन नाट्य परिषद उपनगर शाखेच्या प्रमुख कार्यवाहक चैत्राली जावळे, नाट्य परिषदेच्या मध्यवर्ती शाखेचे कोषाध्यक्ष सतीश लोटके, मध्यवर्तीचे नियामक मंडळ सदस्य संजय दळवी, अहिल्यानगर जिल्हा शाखेचे अध्यक्ष अमोल खोले, कोषाध्यक्ष जालिंदर शिंदे व मार्गदर्शक पी.डी. कुलकर्णी यांनी केले आहे.

# मराठी नाट्य संमेलनात सहभागी होणार दिग्गज कलाकार

## सुरेल संगीत रजनी, व्यावसायिक नाटकांची मेजवानी

नगर – नगरमध्ये आयोजित शतकमहोत्सवी अखिल भारतीय मराठी विभागीय नाट्य संमेलनानिमित्त मराठी सिने नाट्य सृष्टीतील दिग्गज कलाकारांशी संवाद साधण्याची संधी नगरकर रसिकांना मिळणार आहे. पेमराज सारडा महाविद्यालय मैदान तसेच माऊली सभागृहात २६ व २७ जानेवारी रोजी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष तथा प्रसिध्द अभिनेते प्रशांत दामले, अभिनेते भरत जाधव, भार्गवी चिरमुले, वैभव मांगले, मानसी नाईक यांच्यासह अनेक दिग्गज कलाकार संमेलनात सहभागी होणार आहेत, अशी माहिती संमेलनाचे स्वागताध्यक्ष डॉ.बापूसाहेब कांडेकर व निमंत्रक आ. संग्राम जगताप यांनी दिली.

विभागीय नाट्य संमेलनानिमित्त २५ जानेवारीला रात्री ८ वाजता माऊली सभागृहात संतोष पवार दिग्दर्शित 'मर्डरवाले कुलकर्णी' या गाजलेल्या नाटकाचा प्रयोग होणार आहे. वैभव मांगले, भार्गवी चिरमुले, निमिष कुलकर्णी, विकास चव्हाण, सुकन्या काळण यांची भूमिका असलेले हे नाटक रसिकांसाठी पर्वणी ठरणार आहे. २६ जानेवारी रोजी ८ वाजता पेमराज सारडा महाविद्यालयाच्या प्रांगणात संगीत रजनी आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये अभिनेत्री मासी नाईक, माधवी निमकर, गायिका सन्मिता धापटे, हास्यजत्रा फेम अभिनेत्री विशाखा सुभेदार, अभिनेते कमलाकर सातपुते, गायक राहुल सक्सेना आदी सहभागी होणार असल्याची माहिती विभागीय संमेलन प्रमुख क्षितीज झावरे व नाट्य परिषदेच्या उपनगर शाखेचे अध्यक्ष प्रा. प्रसाद बेडेकर यांनी दिली.

२७ जानेवारी रोजी रात्री ८ वाजता पेमराज सारडा महाविद्यालयाच्या प्रांगणात आचार्य अत्रे लिखित 'मोरुची मावशी' या अजरामर नाटकाचा प्रयोग रंगणार आहे. मावशीची मुख्य भूमिका प्रसिध्द अभिनेते भरत जाधव साकारणार आहेत. व्यावसायिक नाटक, चित्रपटसृष्टीतील कलाकारांसह हौशी रंगकर्मी, नवोदित कलाकार एकांकिका सादर करून प्रेक्षकांना निखळ आनंद देणार आहेत.

सर्व कार्यक्रमासाठी प्रवेश विनामूल्य असून नगरकर रसिकांनी संमेलनास हजेरी लावावी, असे आवाहन असे आवाहन नाट्य परिषद उपनगर शाखेच्या प्रमुख कार्यवाहक चैत्राली जावळे, नाट्य परिषदेच्या मध्यवर्ती शाखेचे कोषाध्यक्ष सतीश लोटके, मध्यवर्तीचे नियामक मंडळ सदस्य संजय दळवी, अहिल्यानगर जिल्हा शाखेचे अध्यक्ष अमोल खोले, कोषाध्यक्ष जालिंदर शिंदे व मार्गदर्शक पी. डी. कुलकर्णी यांनी केले आहे.



कवियत्री पुष्पा जोशी यांच्या पुष्पांजली या कवितासंग्रहाचे प्रकाशन माजी प्राचार्य व ज्येष्ठ साहित्यिक डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांच्या हस्ते झाले.

# कवियत्री पुष्पा जोशी यांच्या पुष्पांजली काव्य संग्रहाचे प्रकाशन

नगर – कवियत्री पुष्पा जोशी यांच्या पुष्पांजली या कवितासंग्रहाचे प्रकाशन माजी प्राचार्य व ज्येष्ठ साहित्यिक डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांच्या हस्ते छोट्याखानी कार्यक्रमात करण्यात आले. यावेळी पुष्पांजली काव्यसंग्रहातील कवितांचे वाचन करण्यात आले. यावेळी उपस्थित श्रोते मंत्रमुग्ध झाले. कार्यक्रमास सारंग जोशी, सुवर्णा कडेकर, विजया निसळ, उषा सहस्रबुद्धे व रसिक उपस्थित होते. शुभांगी जोशी यांनी प्रस्ताविक करून आभार मानले.

